रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक १४४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, ११ डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अंबादास दानवेंवर गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन/२
म्हसळ्यातील ऋषिकेश माळीकडून 'कळसूबाई' सर/५
राज्यस्तरीय तायक्वांडो स्पर्धेत रायगडचा संघ चॅम्पियन/८

## जमिनीच्या एनए परवानगीनंतर सनदची अटही रद्द

**नागपूर :** राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक



महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट रद्द केल्यानंतर आता त्या पुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली असून या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५' महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी विधानसभेत मांडले. जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर १००० चौरस मीटरपर्यंत रेडी रेकनरच्या ०.१ टक्का, १००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंत रेडी रेकनरच्या ०.२५ टक्के, ४००१ चौरस मीटर व त्यापुढील भूखंडांसाठी रेडी रेकनरच्या ०.५ टक्के प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल. या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून त्यांना त्यांचा वाटा मिळेल.

# 'दिबां'च्या विमानतळ नामकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक

### सीएम लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार –आमदार प्रशांत ठाकूर

**नागपूर : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या विमान उड्डाणापूर्वी लोकनेते दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव दिले जावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राज्याचे वनेमंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने बुधवारी (दि. १०) नागपूर येथे भेट घेत चर्चा केली. लोकनेते दि.बा. पाटील विमानतळ नामकरणासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपण सकारात्मक असल्याचे तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वस्त केल्याचे सांगून याबाबत मुख्यमंत्री महोदय लवकरच प्रेस स्टेटमेंट देणार असल्याची माहिती आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली, त्या वेळी मंत्री आशिष शेलार, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार किसन कथोरे, आमदार रविशेठ पाटील, आमदार सुलभा गायकवाड, माजी खासदार संजीव नाईक, लोकनेते दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, विनोद म्हात्रे, राजेश गायकर व समितीचे सदस्य उपस्थित होते.

यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्या वतीने प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत्या २५ तारखेला खुले होणार आहे. ते खुले होण्याच्या आधी राज्य सरकारने या विमानतळाला घोषित केलेले लोकनेते दि.बा. पाटील हे नामकरण किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेतील 'दिबां'च्या नावाचा नामविस्तार व्हावे या दृष्टिकोनातून आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्री गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने भेट घेतली. नवी मुंबई विमानतळावर पहिले उड्डाण होण्याआधी या विमानतळाचे 'दिबा'साहेबांच्या नावाने नामकरण झाले पाहिजे यासाठी प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये मागणी व अस्वस्था आहे आणि ठिकठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीच्या आंदोलनांची घोषणा होत आहे. अशावेळी या विमानतळाला 'दिबा'साहेबांचे नाव पहिले उड्डाण होण्यापूर्वी लागले पाहिजे ही प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांची तळमळ आहे.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे विमानतळाला लागण्यासाठी झालेल्या अनेक मोर्चे, आंदोलन संघर्षात आम्हा सर्वांवर फौजदारी गुन्हे दाखल असल्याचे सांगून सगळ्यात जास्त तळमळ आमच्यात, प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमध्ये असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी नमूद केले. त्यामुळेच आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आम्ही सर्वांनी भेट घेत उड्डाणापूर्वी 'दिबा'साहेबांच्या नावाने विमानतळाचे नामकरण झाले पाहिजे अशी पुनर्मागणी केली. यावर मुख्यमंत्र्यांनी नेमके त्याच्या आधी होईल का सांगता येणार नाही, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आश्वस्त केले आहे. त्यामुळे विमानतळाला दि.बा. पाटीलसाहेबांचे नाव लागणारच, असे स्पष्ट केले. या संदर्भात त्यांनी प्रेस स्टेटमेंट द्यावे अशी आमच्या शिष्टमंडळाने विनंती केली. त्यावर त्यांनी लवकरच यथायोग्य प्रेस स्टेटमेंट देणार असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे लवकरच मुख्यमंत्रीमहोदय प्रेस स्टेटमेंट देऊन प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांमधील संदिग्धता मिटवतील अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्ष ज्या वेळेला 'दिबा'साहेबांच्या नावाचे नामकरण होईल त्या वेळेला विजयी उत्सव आम्ही साजरा करू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. **(पान २ वर...)**





### 'त्यांना' प्रश्न विचारायचा अधिकार नाही!


विरोधकांच्या वक्तव्यावर विचारलेल्या पत्रकारांच्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी रोखठोकपणे सांगितले की, खरंतर ज्या प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांनी आंदोलनात भाग घेतला त्यांना या संदर्भात जाब विचारण्याचा अधिकार आहे, पण ज्यांनी दि.बा. पाटीलसाहेबांचे नावही घेतले नाही, कारण त्यांना त्या वेळी 'दिबा'साहेबांच्या नावाची काविळ होती आणि राजकारणात तर फार आधीपासून असताना यापूर्वी झालेल्या आंदोलनात ते कुठेही दिसले नाहीत, उलट स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव दिले जावे याच्यापुढे ते शब्दही काढत नव्हते अशांना तर आम्हाला कुठलाही प्रश्न विचारायचा अधिकार नाही.

# विधीमंडळात ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये खुर्चीवरून वाद

### थेट विधानसभा अध्यक्षांची मध्यस्थी

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार संघर्ष अपेक्षित असताना महाविकास आघाडीच्या तंबूतच खुर्चीवरून वाद सुरू आहे. विधीमंडळातील आसन व्यवस्थेवरून शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसच्या आमदारांमध्ये खटके उडाले. हा वाद इतका वाढला की, काँग्रेस आमदारांनी थेट विधानसभा अध्यक्षांची भेट घेतली. यानंतर ठाकरे गटाच्या पुढच्या रांगेतील दोन जाग कमी करून काँग्रेसला देण्यात आल्या.



सभागृहातील पहिल्या काही रांगांमध्ये बसण्यासाठी दोन्ही गटांमध्ये वाद झाला. सभागृहामध्ये शिवसेना ठाकरे गटाच्या २० आमदारांपैकी १४ आमदारांना पुढील रांगेत बसण्याची व्यवस्था आहे. तुलनेत काँग्रेसच्या १६ आमदारांपैकी फक्त चार आमदारांना पुढे जागा दिली आहे. यामुळे काँग्रेसच्या ज्येष्ठ आमदारांना ठाकरे गटाच्या नवीन आमदारांच्या मागे बसावे लागत होते. यामुळे दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये वाद होता. याबाबत ठाकरे गटाला बाजूला ठेवत काँग्रेसच्या आमदारांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेतली होती.

संख्याबळ व ज्येष्ठतेनुसार काँग्रेसने पुढील जागांवर दावा केला, तर प्रथा परंपरेप्रमाणे ठाकरे गटाने पुढील जागांवर दावा केला होता. अखेर ठाकरे गटाला माघार घ्यावी लागली आणि त्यांच्या पुढील दोन जागा कमी करत काँग्रेसला देण्यात आल्या. पुढे बसण्यावरून काँग्रेसने घेतलेल्या पवित्र्यामुळे ठाकरे गटात नाराजी आहे.

दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या तीन दिवसांत पायऱ्यांवर केवळ एकदा आंदोलन झाले. तिसऱ्या दिवशी तर विरोधकांना आंदोलनाचा विसरच पडला. विरोधी पक्षनेता नसल्याने जबाबदारी कोणी घ्यायची यावरून संभ्रम असल्याचे बोलले जात आहे.

## चांदीचा नवा उच्चांक

**नवी दिल्ली :** देशात चांदीच्या दरांनी बुधवारी (दि.१०) नवी उच्चांकी पातळी गाठली. मंगळवारच्या तुलनेत साडेसहा हजार रुपयांनी चांदी महाग झाली आणि मुंबईच्या बाजारपेठेत एक किलो चांदीसाठी एक लाख ९१ हजार रुपये मोजावे लागत होते.

सोन्याच्या दरात मात्र फारशी वाढ झाली नाही. एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी एक लाख ३१ हजार रुपये मोजावे लागत होते.

## 'ई–वाहनांना टोलमाफीची आठ दिवसांत अंमलबजावणी करा'

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील ईव्ही व ई–बाइक वापरकर्त्यांना टोलमाफी देण्याबाबत पुढील आठ दिवसांत कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देत या निर्णयाच्या अंमलबजावणीपासून आजपर्यंतच्या काळात टोल घेतला गेला असल्यास पुरावा सादर केल्यावर नागरिकांना टोल परतावा द्यावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिले.

ई–वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब सदस्य अनिल पाटील यांनी विधानसभेत मांडली. त्यावर अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी हे निर्देश दिले.

## निवडक

### गडचिरोलीत आणखी ११ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**गडचिरोली :** येथे ११ जहाल नक्षलवाद्यांनी महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर बुधवारी (दि. १०) आत्मसमर्पण केले. विभागीय समितीच्या दोन सदस्यांचाही यात समावेश आहे. या नक्षलींवर एकंदर ८२ लाख रुपयांचे बक्षीस होते. या वेळी शुक्ला यांनी जहाल नक्षलवादी भूपती याच्या शरणागतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सी–६० कमांडोंचा सत्कार केला तसेच उर्वरित नक्षवाद्यांनाही शस्त्रे टाकून आत्मसमर्पण करावे, असे आवाहन केले.

### 'युनेस्को'च्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश

**नवी दिल्ली :** भारतभर साजरा केला जाणारा दीपावलीचा सण आता मानवतेचा अमूर्त वारसा बनला आहे. 'युनेस्को'च्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश केल्याचे समितीच्या बैठकीनंतर जाहीर करण्यात आले. केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी ही माहिती दिली. यापूर्वी रामलीला, दुर्गापूजा आणि इतर अनेक भारतीय परंपरांचा तसेच पारंपरिक कौशल्यांचा या यादीत समावेश आहे.

# नागपुरात बिबट्याचा धुमाकूळ

## अखेर जेरबंद, पाच जण जखमी




**नागपूर : प्रतिनिधी**

अलिकडे राज्यातील अनेक भागांमध्ये बिबट्याचा मानवी वस्तीत वावर वाढला आहे. नागपूरच्या पारडी भागातील शिवनगर परिसरात बुधवारी (दि.१०) सकाळी बिबट्या दिसून आल्याने एकच खळबळ उडाली. या बिबट्याने पाच जणांवर हल्ला केला. सुमारे तीन तासांच्या प्रयत्नांनंतर वनविभागाने बिबट्याला जेरबंद केले. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी बंदुकीतून बिबट्याच्या शरीरावर दोन डार्ट मारले. गुंगीचे औषध शरीरात भिनल्यामुळे हा बिबट्या गच्चीतून अखेर खाली पडला. त्यानंतर वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी त्याला उचलले. तत्पूर्वी चार ते पाच लोकांना या बिबट्याने जखमी केले. वनमंत्री गणेश नाईक यांनी रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली.

### विविध उपाययोजना

वनमंत्री गणेश नाईक यांनी नागपूर हिवाळी अधिवेशनात बिबट्यांसंदर्भात सुरू असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती दिली. बिबट्यांना जंगलातच भक्ष्य मिळावे. त्यांनी गावात येऊन कुत्रे आणि माणसांवर हल्ले करू नयेत यासाठी वनखात्याकडून प्रयत्न सुरू आहेत. या अनुषंगाने जंगलात शेळ्या सोडण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. जुन्नर, आंबेगाव, शिरूर तालुक्यात तशी सुरुवातही झाली आहे, असे वनमंत्री नाईक यांनी सभागृहात विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. राज्यातील ज्या भागांमध्ये जास्त बिबटे आहेत, तेथील बिबटे आफ्रिकेला पाठवण्यासंदर्भातही विचार सुरू असल्याचे ते म्हणाले.

# हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या चमूला सात पारितोषिके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित ६४वी हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धा ठाणे केंद्रावर झाली. या स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे सारिका ढेरंगे लिखित आणि अभिजित झुंझारराव दिग्दर्शित सादर झालेल्या नारायणी या दोन अंकी नाटकाला सात पारितोषिक प्राप्त झाली आहेत.

स्पर्धा डॉ. काशिनाथ घाणेकर मिनी नाट्यगृह घोडबंदर येथे झाली. या स्पर्धेत श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या नारायणी या नाटकाने सात पारितोषिके मिळविली आहेत.

यामध्ये सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजनेसाठी श्याम चव्हाण (प्रथम), वेशभूषा आणि रंगभूषा रितूपर्ण कीर्तोनिया (द्वितीय), संगीत गणेश जगताप (द्वितीय), नेपथ्य रितू, रोहित, आर्यन (तृतीय) तसेच सानिका पाटील व क्षितिज गायकवाड (गौरव प्रमाणपत्र) यांना पारितोषिके मिळाली. या सर्वांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कलाकारांच्या पाठीशी नेहमी उभे असणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि मंडळाचे सचिव व नाट्य परिषद उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी या स्पर्धेसाठी कलाकारांना प्रोत्साहन दिले होते.

# नाताळनिमित्त बाजारपेठा सजल्या

**पनवेल : वार्ताहर**



ख्रिसमस अर्थात नाताळ सण काही दिवसांवर असल्याने विविध ठिकाणच्या बाजारपेठा सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. ख्रिसमसनिमित्त होणाऱ्या सेबिब्रेशनची आतापासूनच जय्यत तयारी सुरु झाल्याचे दिसत आहे.

नाताळ सण ख्रिश्चन धर्मियांचा असला तरी इतर जाती–धर्मातील नागरिकांकडूनही तो साजरा केला जातो. विशेषकरून बच्चे कंपनीमध्ये या सणाचे विशेष आकर्षण असते. नाताळ जवळ आल्याने शहरांतील बाजारपेठा, दुकाने व मॉल्स ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी लाईट्स, बेल्स, स्टार्स, सांताच्या टोप्या, केक, सजावटीच्या वस्तू आदी साहित्याने सजल्या आहेत.

ख्रिसमसनिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे. सद्यस्थितीत बाजारपेठेत सजावटीच्या वस्तूंमध्ये विविध आकारांचे ख्रिसमस ट्री, जिंगल बेल्स, विद्युत माळा (लाईट्स), स्टार्स, टिनसेल, बॉल्स व स्टॉकिंग्ज, ख्रिस्त जन्माचे साहित्य, मुखवटे आणि सांताक्लॉजच्या टोप्या दाखल झाल्या आहेत. खाद्यपदार्थांमध्ये विविध फ्लेवर्सचे केक, विशेषतः प्लम केकची मागणी जास्त असते. त्यामुळे हे केक उपलब्ध करून देण्यावर दुकानदारांकडून भर दिला जात आहे.

विशेषकरून लहान मुलांसाठी बाजारात सांताक्लॉजसारखे ड्रेस, कानटोपी, ग्लोज, शूज, पोतडी बॅग्जही आल्या आहेत. बच्चेकंपनीत सांताक्लॉजचे खास आकर्षण असल्याने चॉकलेट गिफ्ट घेऊन येणाऱ्या सांताक्लॉजचे आकर्षक मुखवटे, टोपी यांची खरेदी आतापासून होताना दिसत आहे. काही ठिकाणी साहित्याच्या किमतीत वाढ झाली असली तरी उत्साहामुळे खरेदी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# राज्यात थंडीचा जोर वाढला!

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात थंडीचा कडाका अचानक मोठ्या प्रमाणात वाढला आहे. उत्तरेकडील राज्यांतून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यातील किमान तापमानाचा पारा लक्षणीयरीत्या खाली आला असून येत्या काही दिवसांत थंडी अधिक तीव्र होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे.

खान्देशात थंडीने कहर केला आहे. नाशिकमध्ये पारा सात अंशांपर्यंत खाली जाईल, तर जळगावमध्ये तापमान सहा अंशांवर पोहचण्याचा अंदाज आहे. यामुळे जळगाव जिल्हा राज्यातील सर्वात थंड ठिकाणांपैकी एक ठरण्याची शक्यता आहे. नंदुरबार, धुळे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतही मोठी गारठ्याची लाट जाणवणार आहे. याशिवाय जास्त थंडीचा अनुभव पश्चिम महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रात अपेक्षित आहे. पुणे शहरात १० डिसेंबरला किमान तापमान आठ अंशांपर्यंत, तर पुढील दोन दिवसांत ते सात अंश सेल्सिअसवर पोहचण्याची शक्यता आहे. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यांसाठी हवामान खात्याने 'यलो अलर्ट' जारी केला आहे. कोकण किनारपट्टीवरही सकाळी व संध्याकाळी चांगलीच थंडी जाणवेल, असा अंदाज आहे.

# माणगावची रोलर स्केटिंगपटू अन्विता बुटेची गिनीज बुकमध्ये नोंद

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

माणगाव येथील रोलर स्केटिंगपटू अन्विता संजय बुटे हिने कर्नाटकातील बेळगाव येथे झालेल्या शिवगंगा रोलर स्केटिंग स्पर्धेत १०० मीटर अंतर केवळ २२.२२ सेकंदांमध्ये पूर्ण केले. या अद्वितीय कौशल्याची दखल घेत गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सने तिचे नाव जागतिक विक्रमधारक म्हणून नोंदवले आहे.

माणगाव विद्यानगरची रहिवासी आणि सरदार वल्लभभाई पटेल विद्यालयात इयत्ता नववीत शिकत असलेल्या अन्विताला लहानपणापासूनच स्केटिंगची आवड निर्माण झाली. तिच्यातील क्षमता ओळखून आई–वडील संजय व संजना बुटे यांनी कठीण परिस्थितीतही तिच्या स्वप्नाला बळ दिले. हीच जिद्द आणि पाठिंबा घेऊन अन्विताने ७८ मिनिटे अखंड स्केटिंग करत जागतिक पातळीवर नवा मानदंड निर्माण केला. आजवर हा विक्रम कोणीही तोडू शकलेले नाही.

स्केटिंगसोबतच अन्विताने आइस स्केटिंग बँडी हॉकीमध्येही राष्ट्रीय पातळीवर पदक जिंकले आहे. देश–विदेशातील स्पर्धांमध्ये तिने आजवर



मिळवलेली १००हून अधिक सुवर्ण, रौप्य आणि कांस्यपदके तिच्या उज्ज्वल वाटचालीची साक्ष देतात. नुकत्याच इंडोनेशियात झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत तिने पुन्हा एकदा पराक्रम करत सुवर्णपदकाची कमाई केली आणि भारताचा तिरंगा उंचावत जगभरात आपली छाप उमटवली.

अन्विताच्या प्रगतीमागे प्रशिक्षक संतोषकुमार मिश्रा यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. त्याचप्रमाणे तिच्या या उज्ज्वल यशामध्ये स्पोर्ट्स अकादमी आणि एस.एम. स्पोर्ट्स अकादमी यांचे सहकार्य लाभले आहे.

# अंबादास दानवेंवर गुन्हा दाखल करा

## शिवसेना पदाधिकाऱ्यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन



**अलिबाग: प्रतिनिधी**

अंबादास दानवे यांच्या कथीत कॅशबॉम्ब नंतर आज रायगड मधील शिवसेनेच्या पदाधिकारयांनी रायगडच्या पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांची भेट घेतली. यावेळी खोटा व्हिडिओ पसारीत केल्याप्रकरणी दानवे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

दानवे यांनी व्हिडिओ क्लिप जारी करताना तीन छोटे व्हिडिओ दाखवले आहेत.यात महेंद्र दळवी यांचा एक व्हिडिओ आहे तर दुसरया विहडिओ मध्ये नोटांची बंडले माजणारी व्यक्ती दुसरीच आहे. आमदार दळवी यांची बदनामी करण्यासाठी ही व्हिडिओ क्लीप जारी करण्यात आली असल्याचा आरोप निवेदनात केली आहे.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी, जिल्हा परीषदेतील माजी गटनेत्या मानसी दळवी, रायगड जिल्हा महिला आघाडी संपर्क संघटिका संजीवनी नाईक, माजी तालुका प्रमुख दीपक रानवडे, संतोष निगडे, जीवन पाटील यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## आमदार महेंद्र दळवी यांना बदनाम करण्याचा कट –शिवसेना युवा नेते विघ्नेश माळी

**मुरुड : प्रतिनिधी**

विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी ट्विट करून पैशांच्या अनेक थप्पी असलेला व्हिडीओ व्हायरल करून एवढेच नाही तर या व्हिडीओत आमदार महेंद्र दळवी यांना दाखवुन त्यांना बदनाम करण्याचा कट स्थान मध्ये जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांचा हात आहे.असा गंभीर आरोप शिंदे शिवसेना जिल्हा युवा नेते विघ्नेश माळी यांनी आज शहरातील शिवसेना पक्षांच्या कार्यालया घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केला आहे.



विघ्नेश माळी पुढे म्हणाले की कालच आमदार महेंद्र दळवी यांनी ही मिडीयाच्या समोर येऊन सांगितले की त्या व्हिडिओ मध्ये मी नसुन मला बदनाम करण्याचा कट स्थान आहे.हा ऐ आय च्या माध्यमातून बनवलेली किल्प असुन त्यांचा लवकरच उलगडा होईल.जर माझ्या केलेले आरोप सिद्ध झाले तर मी तात्काळ आमदारकीचा राजीनामा देईन असा बोलणारे आमचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या पाठीशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेनेचे आमदार व सर्व महाराष्ट्रातील जनता त्यांच्या पाठीशी आहे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी जिल्हात व आपल्या मतदारसंघात केलेली विकासकामे ही कामे जिल्हात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला डोईजड होऊ लागले आहेत म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडुन ऐआयच्या माध्यमातून खोटी क्लिप बनुन बदनाम करण्याचा कट रचला गेला आहे. परंतु रचलेला कट शिवसेना पक्षांचे कार्यकर्ते हाणुन पाडेल आणि सत्य महाराष्ट्राच्या जनते समोर आणु.परंतु अंबादास दानवे यांनी केलेले कृत्य घुणास्पद आहे.त्यांचा आम्ही निषेध करु तेवढा कमी आहे. आता कोणाताही पद नसलेला नेता आसुन आपल्या गुरुला खुष करण्यासाठी केलेले षडयंत्र सध्या विरोधी पक्षाकडे कोणते विषय अधिवेशनात नसल्याने असे खोटे प्रकार केले जात आहेत तरी जिल्हासह महाराष्ट्रातील जनता या कृत्य करणारे यांना ओळखून आहे मत मत पत्रकार परिषदेत मध्ये युवा नेते विघ्नेश माळी यांनी केले. यावेळी युवा नेते– विघ्नेश माळी, उपजिल्हा प्रमुख भरत बेलोसे, तालुका प्रमुख निलेश घाटवल, व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य –मुख्यमंत्री




**नागपूर : प्रतिनिधी**

राज्याने पंप स्टोरेजमध्ये ७६,११५ मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेपर्यंत मजल मारली आहे.महाराष्ट्राला पंप स्टोरेज हब बनवण्याचे लक्ष्य असून महाराष्ट्रात पंप स्टोरेज प्रकल्पांच्या उभारणीसाठी झालेल्या करारांमुळे ५,८०० मेगावॅट वीजनिर्मिती क्षमतेची वाढ होणार आहे. या प्रकल्पात २३,८०० कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११,५०० रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पश्चिम घाट उदंचन जलविद्युत प्रकल्प, कोयना टप्पा– ६ उदंचन जलविद्युत प्रकल्प आणि सरोवर उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी जलसंपदा विभाग आणि जेएसडब्लू निओ एनर्जी लि., महाजेनको रिन्यूबल एनर्जी लि.व न्यु एशियन इन्फ्रा. डेव्हलपमेंट प्रा.लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आले.

या कार्यक्रमास जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे) मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण खोरे) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, आमदार सुरेश खाडे, आमदार नरेंद्र मेहता, आमदार चित्रा वाघ, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते.

## रवीश कुमार सिंग जेएनपीएचे उपाध्यक्ष

**उरण :** भारतातील सर्वात मोठे कंटेनर हाताळणी करणाऱ्या बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) च्या उपाध्यक्ष पदाचा रविश कुमार सिंह यांनी स्वीकारला .जेएनपीए येथे आगमन झाल्यानंतर, विभागप्रमुखांच्या उपस्थितीत जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल यांनी त्यांचे हार्दिक स्वागत केले. जेएनपीएच्या भविष्यातील विस्तारात ते या महत्त्वाच्या भूमिकेत प्रवेश करत असताना त्यांना शुभेच्छा दिल्या.



## 'साधना नायट्रोकेम' चोरीप्रकरणी व्यवस्थापनावर गुन्हा दाखल करा

**धाटाव : प्रतिनिधी**

साधना नायट्रोकेम कंपनी मधून पावणे दोन कोटी रुपये किंमतीच्या कॅटालिस्ट पावडरची चोरी झाल्याचे उघडकीस आले होते. स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने मोठ्या शिताफीने या चोरीचा पर्दाफाश केला आणि ९ जणांच्या मुसक्या आवळल्या.

चोरी झालेले उत्प्रेरक कोट्यवधी रुपये किंमतीचे असूनही, त्याच्या सुरक्षेच्या बाबतीत कंपनी प्रशासनाने निष्काळजीपणा दाखविला आहे. त्यामुळे या चोरीमध्ये कंपनी प्रशासनातील अधिकारी सामील असल्याचे आरोप सर्व बाजूंनी होऊ लागले आहेत. सुरक्षा रक्षकांनी कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट दिसत असूनही त्यांना कंपनी प्रशासन पाठीशी घालत आहे. याविरोधात तक्रारी प्राप्त झाल्यावर रोहा सिटिझन फोरम आक्रमक झाले असून फोरमचे अध्यक्ष नितीन परब यांनी साधना कंपनीचे प्रोडक्शन मॅनेजर यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

रासायनिक अभिक्रियेच्या दरात वाढ होण्यासाठी चोरी झालेले उत्प्रेरक वापरले जातात. याचा साठा करण्यासाठी संतुलित वातावरण अपेक्षित असते. मात्र कंपनी प्रशासनाने कोट्यावधी रुपयांच्या उत्प्रेरकाचा साठा अवैधरित्या गेस्ट हाऊसमध्ये केला. बेडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. १५ सप्टेंबर ते १२ नोव्हेंबर दरम्यान चोरट्यांनी कंपनीच्या गेस्ट हाऊसची खिडकी फोडून कॅटालिस्ट पावडरच्या बॅगा लंपास केल्या. मात्र ३ ऑक्टोबर रोजीच माल लंपास झाला ती खिडकी फोडलेली असल्याचे कामगारांनी कंपनी व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणले होते.

गुन्हा उघडकीस आल्यावर सुद्धा कंपनी प्रशासनाने तक्रार दाखल करण्यास टाळाटाळ केली होती. २३० किलो वजनाच्या कॅटालिस्ट पावडरची किंमत पावणेदोन कोटी रुपये आहे, हे फक्त कंपनी अधिकाऱ्यांना माहिती असते. त्यामुळे कामगारांमधून प्रशासना विरोधात प्रचंड संताप व्यक्त होत आहे. रोहा सिटिझन फोरमने खाजगी केस दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

## एसटी बसच्या चालक–वाहकांचा मुजोरपणा सहन करून घेतला जाणार नाही : नगरसेविका ममता थोरे

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसच्या चालक व वाहकांचा मुजोरपणा दिवसेंदिवस वाढत असून हा मुजोरपणा यापुढे आम्ही नागरिक सहन करून घेणार नाही असा इशारा माणगाव नगरपंचातीच्या नगरसेविका ममता थोरे यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना एसटी महामंडळाला दिला आहे.



माणगाव बस स्थानकात मंगळवार दि.९ डिसेंबर रोजी सकाळी पुण्याहून महाडकडे येणाऱ्या एसटी बसच्या महिला वाहकाने एका अपंग व्यक्तीच्या कॉलरला धरून त्याच्याकडे अरेरावी केल्याची माहिती अपंग व्यक्ती व त्याच्या नातेवाईकांनी माणगावच्या नगरसेविका ममता थोरे यांना दिली. यानंतर हि गाडी पुन्हा महाडकडून पुण्याकडे जात असताना माणगाव बसस्थानकात आली असता या बसमधील महिला वाहक चालकाला नगरसेविका थोरे यांनी आपण अपंग व्यक्तीला अशी कशी वागणूक देता. एसटी बस हि नागरिकांना सेवा देण्यासाठी आहे. तुम्ही एसटी महामंडळाचे कर्मचारी असून तुम्ही प्रवाशांशी मुजोरपणाने न वागता प्रवाशांजवळ चांगले राहिले पाहिजे. असे सांगितल्यावर सदर महिला वाहकाने मला त्या व्यक्तीने शिवीगाळी केल्याचे सांगितले.


त्यावेळी या घटनेदरम्यान उपस्थित असलेल्या एका महिलेने त्या अपंग व्यक्तीने शिवीगाळी केली नाही असे सांगितले. यानंतर त्या वाहक महिलेने मी चुकले असेन तर मला माफ करा असे सांगून नंतर ती वाहक महिला माणगाव बस्थानकात बसची नोंद झाल्यावर पुण्याकडे रवाना झाली. परंतु प्रवाशांना व अपंग प्रवाशांना अशाप्रकारे महामंडळाचे कर्मचारी वागणूक देत असतील तर ते चुकीचे असून अशा मुजोर कर्मचाऱ्यांवर महामंडळाने कारवाई करण्याची मागणी नगरसेविका ममता थोरे व सहकाऱ्यांनी यावेळी केली. तसेच यावेळी माणगाव बसस्थाकात उपस्थित असणाऱ्या प्रवाशांनीही बस कर्मचाऱ्यांच्या अशा वागणुकीबद्दल तीव्र संताप व्यक्त केला.

या घटनेबद्दल प्रसार माध्यमांजवळ बोलताना ममता थोरे यांनी सांगितले कि,एसटी बसच्या विशेष करून पुणे व मुंबई परिसरातील वाहक व चालकांचा मुजोरपणा हा वाढत चालला असून यापुढे महामंडळाचा कोणीही कर्मचारी अरेरावीने वागणार असेल तर ते खपवून घेतले जाणार नाही. हयाकडे राज्याच्या महिला व बालविकासमंत्री ना.आदितीताई तटकरे,राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री ना.भरतशेठ गोगावले,राज्य परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विशेष लक्ष घालून अशा मुजोर कर्मचाऱ्यांना सूचना देऊन त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी नगरसेविका थोरे यांनी केली आहे. प्रहार संस्थेचे कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या 'निष्पाप' नाटकाचा आज प्रयोग

**मुंबई :** चोवीस तास बातम्यांच्या जगात वावरणाऱ्या पत्रकारांच्या संवेदनशीलता आणि सर्जनशीलतेला रंगभूमीवर योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने मुंबई मराठी पत्रकार संघ पहिल्यांदाच ६४ व्या राज्य नाट्य स्पर्धेत सहभाग नोंदवत आहे. संघातर्फे सादर होणाऱ्या 'निष्पाप' या द्वि–अंकी नाटकाचा पहिला प्रयोग गुरुवार, ११ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता साहित्य संघ मंदिर येथे होणार आहे.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण निर्मित या नाटकासाठी लेखक प्रा. दिलीप परदेशी यांचे प्रभावी लेखन आणि दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांचे कसदार दिग्दर्शन लाभले आहे. 'निष्पाप' हे नाटक पत्रकारांच्या अभिनयकौशल्याला नवी दिशा देणारे ठरणार आहे. ज्येष्ठ पत्रकार देवदास मटाले आणि स्वाती घोसाळकर प्रमुख भूमिकेत आहेत. तसेच दिग्दर्शक गुरुदत्त लाड यांच्यासह प्रशांत चिडे, रश्मी




महांबरे, सिद्धेश शिगवण, सुरेश ठुकरुळ यांच्या या नाटकात महत्वाच्या भूमिका आहेत.

पत्रकार संघाच्या इतिहासातील राज्य नाट्य स्पर्धेतला हा पहिलाच सहभाग असल्याने हा उपक्रम विशेष ठरत आहे. पत्रकारांसाठी – पत्रकारांकडून – पत्रकारांचे हे नाट्यप्रयोग रसिकांसाठी नव्या अनुभवाची मेजवानी ठरणार आहेत.

या प्रयोगास नाट्यप्रेमी आणि पत्रकारांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी केले आहे.

## हुतात्मा हिराजी पाटील आगरी समाज हॉल नगर नामकरण ठराव मंजूर

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हुतात्मे हिराजी गोमाजी पाटील यांना ब्रिटिश गोळीबारात आपले प्राण देशासाठी सोडावे लागले होते. त्यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी कोल्हारे ग्रामपंचायत कडून एका नागरी भागाला 'हुतात्मा हिराजी पाटील आगरी समाज हॉल नगर' असे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. कोल्हारे ग्रामपंचायत कडून सरपंच महेश विरले यांनी हा ठराव मांडला असून त्या ठरावास सर्व ११ सदस्यांनी मंजुरी दिली आहे.

कोल्हारे ग्रामपंचायती कडून हुतात्मा हिराजी पाटील यांचा अर्ध पुतळा तीन वर्षापूर्वी धामोते येथे नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावर बसविण्यात आला होता. त्या परिसरात कर्जत तालुका आगरी समाज संघटना यांच्याकडून हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह उभारले आहे.

त्याचवेळी तेथे उभारण्यात आलेल्या हॉल चे नाव आगरी समाज हॉल म्हणून परिचित आहे. ही बाब लक्षात घेऊन हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृह असलेल्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात लोकवस्ती उभी राहिली आहे. अनेक निवासी संकुले तेथे असून कोल्हारे ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये सरपंच महेश विरले यांच्याकडून ठराव मांडण्यात आला.

हुतात्मा हिराजी पाटील यांचा अर्ध पुतळा असलेला परिसर हुतात्मा हिराजी पाटील आगरी समाज हॉल नगर म्हणून ओळखण्यात यावे. अशा आशयाचा ठराव ग्रामपंचायत मासिक मीटिंग मध्ये मांडण्यात आल्यानंतर ग्रामपंचायत बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व ११ सदस्यांनी या ठरावाला समर्थन दिले. तर माजी उपसरपंच रोशन म्हसकर आणि अस्मिता विरले यांनी अनुमोदन दिले आहे.

पान १ वरुन

### 'दिबां'च्या विमानतळ नामकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक

ज्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आम्हाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शब्द आहे सांगतात आणि तसे आश्वस्त करतात, तो आमच्यासाठी अंतिम आहे. पंतप्रधानांना या संदर्भात भेटणार का या पत्रकारांच्या प्रश्नावर उत्तर देताना आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहोत. त्यांच्या नेतृत्वाखाली जे काही प्रयत्न करायचे आहेत ते सर्व प्रयत्न करू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळाच्या वतीने नमूद केले.

## नागावमध्ये आलेला बिबट्या पुन्हा नैसर्गिक अधिवासात गेल्याची शक्यता

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव मध्ये धुमाकूळ घालणारा बिबट्याला पकडण्यात वनविभागला यश आले नाही. बुधवारी देखील वनविभागाने नागावमध्ये शोधमोहीम राबवली परंतु बिबट्या आढळला नाही. वनविभागाला गुंगारा देऊन हा बिबट्या सुरक्षित पुन्हा आपल्या नैसर्गिक अधिवासात गेला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. असे असले तरी पुढील काही दिवस वनविभागतर्फे नागाव परिसरात बिबट्याची शोध मोहीम सुरूच राहणार आहे.

बुधवारी वनविभागाच्या ८० कर्मचार्यांनी संपुर्ण नागाव परिसरात आज बिबट्या शोध मोहीम राबविली, सकाळच्या सत्रात नागाव मधील वाड्यंमध्ये जाऊन बिबट्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र बिबट्या अथवा त्याच्या अस्तित्वाचे पुरावे आढळून आलेले नाही. त्यामुळे बिबट्या आपल्या नैसर्गिक अधिवासात परत गेला असण्याची शक्यता वनविभागाच्या अधिकार्यांनी व्यक्त केली.

नागावमधील घटनेनंतर वनविभागाने जंगली वन्यजीवांबाबत जनजागृती करण्याची मोहिम सुरू केली आहे. बिबट्या सहसा स्वतः हून हल्ला करत नाही. मात्र जवळ आलेल्या व्यक्तीपासून धोका असल्याची जाणिव झाली तर तो आक्रमक होऊन हल्ला करू शकतो, त्यामुळे बिबट्यांपासून सुरक्षित अंतरावर राहणे आवश्यक असल्याचे वनअधिकार्यांनी सांगितले. शोधमोहीमेत बिबट्या आढळून आला नसला तरी नागरीकांनी सतर्कता बाळगणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. विशेषतः लहान मुलांची काळजी घेणे, त्यांना रात्रीच्या वेळी एकटे न सोडणे, पाळीव जनावरे बंदीस्त ठिकाणी ठेवणे, घराचे दरवाजे खिडक्या रात्री बंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

बिबट्यां आला म्हणून गर्दी करणे, त्याच्यामागे लाठ्या काठ्या घेऊन जाणे, आरडा ओरड करणे यामुळे बिबटे बिथरू शकतात, आणि ते हल्ला करू शकतात. मंगळवारी याच कारणामुळे बिबट्याने सहा जणांवर हल्ला केला. त्यामुळे असे प्रकार टाळावेत असे आवाहन वन अधिकार्यांनी केले आहे.

अन्नाच्या शोधात अथवा नविन अधिवासाच्या शोधात बिबटे आपला नैसर्गिक अधिवास सोडून बाहेर पडतात, आणि भरकटतात, रहिवासी परिसर असल्याचे लक्षात आले की ते आपणहून निघून जातात. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये, पण खबरदारी बाळगावी असे आवाहन अलिबागचे उपवनसंरक्षक राहुल पाटील यांनी केले आहे.

## प्रवाशाला मारहाण करून लुटणाऱ्यांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

प्रवाश्याला मारहाण करून लुटणाऱ्या रिक्षा चालकासह त्याचे इतर सहकार्यांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली रिक्षा हस्तगत केली आहे .

फिर्यादी पंकज सिंग ( वय ४५ ) रा. अजिवली हा आरोपी आकाश चव्हाण ( वय २२ ) याच्या रिक्षातून जात असताना त्यांची रिक्षा तक्का सिग्नल जवळ आली असता आकाश चव्हाण याने पंकज सिंग याला सांगितले की , मला दुसरे भाडे आहे तरी तुम्ही इथेच उतरा व दुसरी रिक्षा पकडून जा असे सांगितल्याने पंकज सिंग याने त्याला भाडे देण्यासाठी पाकीट काढले असता आरोपी आकाश चव्हाण व रिक्षात असलेले त्याचे सहकारी अविनाश पांडव ( वय ३५ ) ,समीर बागवान (वय २१),शुभम आढाव (वय २३ ) यांनी त्याच्या पाकिटातील असलेली रोख रक्कम जबरीने चोरून व त्याला हाताबुक्यांनी मारहाण करून रिक्षा घेऊन ते पसार झाले होते .

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे , पो. हवा मिथुन भोसले , पो.हवा तुषार बोरसे आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या आधारे या चौकडीला गुन्ह्यातील रिक्षासह ताब्यात घेतले आहे .

दुखवटा



### कृष्णा केणी

**उरण :** तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील निवृत्त ग्रामविकास अधिकारी कृष्णा सोमा केणी(८७)यांचे वृद्धपकाळाने दुःखद निधन झाले.त्यांच्यामागे त्यांची पत्नी,मुलगा,सुना, सासुरवाशीण मुली आणि नातवंडे,पतवंडे असा त्यांचा परिवार आहे

# महापालिका उभारणार दिव्यांग वेलनेस सेंटर

## पनवेल क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना वैद्यकीय उपचार व पुनर्वसन सेवा देणार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींना आरोग्य उपचार, समुपदेशन, कौशल्यविकास, थेरपी तसेच पुनर्वसन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक कार्यक्रम राबविण्यासाठी महापालिकेच्यावतीने दिव्यांग व मतिमंद यांच्यासाठी फिजीओथेरपी व मल्टि डिसीप्लनरी थेरपी पुनर्वसन केंद्र अर्थात दिव्यांग वेलनेस सेंटर उभारले जाणार आहे. या दिव्यांग वेलनेस सेंटरच्या माध्यमातून दिव्यांग नागरिकांचे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पुनर्वसन होऊन त्यांना स्वावलंबी बनण्यास मदत होणार असल्याचे आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले आहे.

सध्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात अंदाजे १८६८ दिव्यांग नागरिकांची नोंद असून त्यांना वैद्यकीय सेवा, विविध उपचार पद्धती आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या योजनेचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना सहज, सुलभ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे आहे. याबरोबरच स्वावलंबन व पुनर्वसन प्रक्रियेला गती देणे, व्यावसायिक कौशल्यांद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे हा आहे.

दिव्यांग नागरिकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने महापालिकेने हे महत्वाचे पाऊल उचलले असल्याचे दिव्यांग विभागाचे उपायुक्त रवीकिरण घोडके यांनी सांगितले आहे.

### वेलनेस सेंटरमध्ये २२ सेवा उपलब्ध

*अस्थिरोग तज्ज्ञ सल्ला, मेंदू व मज्जासंस्था तज्ज्ञ सल्ला, वैद्यकीय सल्ला, कान-नाक-घसा तज्ज्ञ सल्ला, नेत्रतज्ज्ञ सल्ला,आयुर्वेदिक सल्ला, होमिओपॅथिक सल्ला, समुपदेशन,नैसर्गिक उपचार पद्धती, फिजिओथेरपी / शारीरिक उपचार, व्यवसायोपचार,भाषण आणि भाषा थेरपी, रोबोटिक उपचार व साहाय्य, दैनंदिन जीवन कौशल्य प्रशिक्षण, योग व ध्यान साधना, मानसिक आरोग्य संवर्धन (संगीत उपचार, कला उपचार, वर्तन सुधारणा, सामाजिक कौशल्य प्रशिक्षण, झुंबा, प्राणायाम इ.), लवकर निदान व हस्तक्षेप तपासणी, ज्येष्ठ नागरिक पुनर्वसन, विशेष अनुरूप कार्यक्रम (गर्भवती महिला, प्रसुतीनंतरची काळजी, ट्रान्सजेंडर व्यक्तींसाठी), आघातानंतर / शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन, व्यावसायिक प्रशिक्षण व कौशल्यविकास,समन्वित वेदना व्यवस्थापन.*



**पनवेल : रायगड भाजप सांस्कृतिक सेलच्या पदाधिकाऱ्यांनी हिंदी बिग बॉस सिझन १९मध्ये तृतीय क्रमांक पटकावणारे आणि पनवेल-खारघरचा गौरव वाढविणारे सुप्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन प्रणित मोरे यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान सेलच्या वतीने मोरे यांचे अभिनंदन करण्यात आले. या वेळी भाजप उत्तर रायगड सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, चिन्मय समेळ, निखिल गोरे, कौस्तुभ सोमण आणि गोविंद राजपुरोहित उपस्थित होते.**



**पनवेल : श्री. कृष्णा पाटील सामाजिक विकास मंडळाच्या वतीने पडघे ते आळंदी देवदर्शन यात्रेचे आयोजन माजी सरपंच कृष्णा पाटील यांनी केले. २०० महिलांना चार बसमधून नेण्यात आले.**

# पनवेलमधील पाच उद्यानांत सोलार ट्रींची उभारणी पूर्ण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेला 'माझी वसुंधरा अभियान ३.०' अंतर्गत राज्यस्तरीय तृतीय क्रमांक मिळाल्यानंतर प्राप्त झालेल्या बक्षीस रक्कमेतून शहरातील विविध प्रभागांमधील पाच उद्यानांमध्ये नाविन्यपुर्ण अशा 'सोलार ट्री' उभारणीचे काम पूर्ण झाले आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या पर्यावरणपूरक उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा प्रकल्प असून, ऊर्जा बचत, स्वच्छ ऊर्जा निर्मिती आणि पर्यावरण जनजागृती यांना मोठा हातभार लागणार आहे. डीपीआर मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या कामाअंतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खालील ५ ठिकाणी सौर-ट्रींची स्थापना करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे सौर ऊर्जा वापराला प्रोत्साहन मिळणार असून, नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत सकारात्मक संदेशही पोहोचणार आहे. पुढील काळात अशाच आणखी पर्यावरणपूरक प्रकल्पांना गती देण्याचा मानस उपायुक्त स्वरुप खारगे यांनी व्यक्त केला आहे. पर्यावरण विभागाची चमकदार कामगिरी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी पनवेल महानगरपालिकेने प्रभावी पावले उचलली आहेत. यामध्ये धूळ नियंत्रण, हवेची गुणवत्ता तपासणी आणि शुद्धीकरणासाठी अत्याधुनिक साधनांचा वापर करून शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि नागरिकांना स्वच्छ हवा उपलब्ध करून देण्यासाठी अनेक प्रभावी उपाययोजना हाती घेतल्या आहेत. यामध्ये ४ फॉग कॅनन वाहने, याशिवाय, एअर मॉनिटरिंग व्हॅन च्या माध्यमातून शहरातील विविध भागांतील हवेची गुणवत्ता (Air Quality Index AAQI) नियमितपणे मोजली जाते. शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी ५ एअर प्युरिफिकेशन सिस्टीम्स बसविण्यात आलेल्या असून लवकरच अजून ५ ठिकाणी या सिस्टीम बसविण्यात येणार आहे.

**स्थापित सोलार ट्रींची ठिकाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | 'अ' प्रभाग - खारघर | सेक्टर २० | प्लॉट २१ |
| २. | नावडे उपविभाग (तळोजा) | सेक्टर १४ | प्लॉट ९२ |
| ३. | 'ब' प्रभाग - कळंबोली | सेक्टर ६ए | प्लॉट २ |
| ४. | 'क' प्रभाग - कामोठे | सेक्टर ५ | प्लॉट ४५ |
| ५. | 'ड' प्रभाग - पनवेल, नवीन पनवेल | सेक्टर १६ | प्लॉट ३ |

# महिलांवरील अत्याचाराविरोधात ऑरेंज द वर्ल्ड कॅम्पेन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिलांवर होत असलेल्या हिंसाचाराच्या विरोधात इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी, वीर वूमेन्स फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी या तीन सामाजिक संस्थानी एकत्र येऊन पनवेल शहर पोलीस स्टेशनचे सिनीयर इन्स्पेक्टर नितीन ठाकरे यांच्या मदतीने ऑरेंज द वर्ल्ड या जनजागृती रॅलीचे आयोजन रविवारी सायंकाळी केले.

महिलांच्या सुरक्षेच्या बाबतीत जनजागृती निर्माण करण्याच्या विषयाबाबतीत श्री. ठाकरे यांनी दाखवलेली उत्फूर्तता व मदत निश्चितच वाखाणण्यासारखी आहे. ठाकरे व त्यांचे इतर सहकारी यांच्या सहाय्यानेच क्लबला ही रॅली यशस्वीपणे पार पाडणे शक्य झाले तसेच सिनीयर वाहतूक पोलीस इन्स्पेक्टर औदुंबर पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांचेही खूप सहकार्य क्लबला ही रॅली उत्तमरीत्या पार पाडण्यास कामी आले.

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीने या वर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर ऑरेंज द वर्ल्ड या थीम अंतर्गत सर्व क्लबना महिलांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आपापल्या क्लबमध्ये वेगवेगळया माध्यमांतून जनजागृती करण्याचे आवाहन केले होते. या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचा एक भाग म्हणून तसेच महिलांविषयी बांधीलकी जपण्यासाठी इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटीने या रॅलीचे आयोजन केले होते.

वडाळे तलाव येथून रॅलीचा श्रीगणेशा करण्यात आला. रॅलीमध्ये पनवेल पोलीस आपापल्या बाईकवरून रॅलीच्या अग्रस्थानी व अन्य सर्व सदस्य शिस्तीत त्यांच्या मागोमाग यापद्धतीने रॅली प्रामुख्याने पनवेल येथील वडाळे तलाव येथुन सुरु होऊन क्रमशः ज्येष्ठ नागरिक हॉल, म्युनिसिपल कॉर्पोरेशन, जय भारत नाका, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, भारतरत्न डॉ. आंबेडकर पुतळा व नंतर ब्रीजखालून पनवेल बस स्टॅंडच्या रोडने पुन्हा वडाळे तलावावर येऊन रॅलीची सांगता करण्यात आली. नंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका झांजुर्णे यांनी माहिलांना संकटाच्या वेळी बचावासाठी स्वतःला कशा प्रकारे तयार करावे व स्वत:च्या सुरक्षेची काळजी कशी घ्यावी यावर उत्तम मार्गदर्शन केले. तसेच पनवेल वाहतूक पोलीस यावेळी सर्व महिलांनी अतिशय शिस्तबद्धतेचे प्रदर्शन करत कुठल्याही प्रकारची नारेबाजी न करता केवळ गाडीवर लावलेल्या बॅनरच्या माध्यमातून आपला संदेश लोकांपर्यंत पोचवण्याच्या उत्कृष्ट प्रयत्न केला. उपस्थित सर्व महिलांनी थीम फॉलो करण्यासाठी घातलेल्या ऑरेंज ड्रेस कोडने जनतेचे लक्ष वेधून घेतले होते.

या वेळी अर्चना ठाकुर तसेच क्लबच्या प्रेसिडेंट सिंपल आंचलिया, सेक्रेटरी युक्तीशाह, पीपी ध्वनी तन्ना, आयपीपी प्रतिभा डांगी, खजिनदार ममता ठक्कर, एडीटर मौसमी गोगुला, जॉईट सेक्रेटरी वैशाली कटारिया, सीसी प्रिया चतुर्वेदी, नम्रता बांठीया, शिला शाह, डॉ. भावना मुरुडकर, किर्ती मुनोत, दुर्गा चौधरी तसेच वीर वुमेन्स ग्रुपच्या सदस्य पुनम जैन, श्रुती निस्सर, सीमा जैन व रोटरी क्लबचे हर्मेश तन्ना, रोहित जाधव, दिप्ती जाधव उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्त्रीरोगांविषयी जनजागृती सत्र



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर व विज्ञान महाविद्यालयात बुधवार दिनांक १० डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला विकास कक्ष व अपोलो हॉस्पिटल्स, सीबीडी बेलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी पीसीओएस व पीसीओडी या महत्त्वपूर्ण आरोग्यविषयक समस्येवर जनजागृतीपर सत्राचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाचा उद्देश मुलींमध्ये या वाढत्या आरोग्य समस्येबाबत योग्य माहिती पोहोचवणे हा होता. या सत्राला एकूण ८६ विद्यार्थिनींनी उपस्थिती दर्शवली. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. रोहिणी खेरा भट (अपोलो हॉस्पिटल) यांनी मार्गदर्शन त्यांनी पीसीओएस/पीसीओडीची कारणे, लक्षणे, प्रतिबंधक उपाय आणि उपचार पद्धती याबाबत सविस्तर माहिती दिली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या कार्यक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल महिला विकास कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे अभिनंदन केले या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सोनी पांडे व प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले इतर सर्व सदस्य व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# आईच्या किडनीमुळे मुलाला नवजीवन; प्रत्यारोपणानंतर दोघांचीही प्रकृती ठणठणीत

**पनवेल : वार्ताहर**

मूत्रपिंडाच्या गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या ३३ वर्षीय तरुणाला त्याच्या आईने किडनी दान करून नवजीवन दिले आहे. मेडिकव्हर हॉस्पिटल नवी मुंबई येथे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या पार पडले. रुग्णाला ॲटिपिकल हेमोलाइटिक युरेमिक सिंड्रोम हा दुर्मिळ आजार झाला होता. डॉ. अमर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली प्रगत उपचारांच्या मदतीने रुग्णाचा जीव वाचविण्यात यश आले.



महाड तालुक्यातील बिरवाडी येथील सूरज पवार यांना २०२४ मध्ये त्रास सुरू झाला होता. स्थिती बिघडत गेल्याने शेवटी मूत्रपिंड प्रत्यारोपण हा एकमेव पर्याय उरला. आपल्या मुलाचे प्राण वाचावेत यासाठी त्यांची आई पुढाकार घेऊन किडनी दान करण्यासाठी पुढे आली. यशस्वी प्रत्यारोपणानंतर सध्या आई आणि मुलगा दोघांचीही प्रकृती उत्तम असून तब्येत सुधारत असल्याची माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी दिली.

नेफ्रोलॉजिस्ट डॉ. अमर कुलकर्णी म्हणाले की, आधुनिक उपचार पद्धती, सातत्यपूर्ण देखरेख आणि योग्य औषधोपचारांमुळे सूरज पूर्णपणे बरा झाला आहे. प्रत्यारोपणानंतर एका वर्षाने तो पुन्हा दैनंदिन कामे, नोकरी व व्यवसाय व्यवस्थित सुरू करू लागला आहे.

# कामोठ्यातील चिमुकल्यांनी अनुभवला आग विझवण्याचा थरार

**कळंबोली : बातमीदार**

आग लागली असताना ती कशी विजवावी लागते, त्यावेळी कोणती दक्षता घ्यावी याची मूल्ये बाल्य अवस्थेतच रुजवण्यासाठी कामोठ्यातील माईन सीड या प्री प्रायमरी शाळेने कळंबोलीतील अग्निशामक केंद्रास बुधवारी सकाळी भेट दिली.

यावेळी कळंबोली अग्निशामक दलाचे प्रमुख मनीष ब्राह्मणकर व त्यांच्या जवानांनी या चिमुकल्यांना विविध प्रकारचे आग विझवण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. हा आगळावेगळा आग विझवण्याचा थरार बाल्यावस्थेतच मुलांनी अनुभवल्यानंतर चिमुकल्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवसानिमित्त बाल्य अवस्थेतील मुलांना आपल्या मानवी हक्काच्या मूल्यांची रुजवून व्हावी,समाजात घडणाऱ्या विविध घटनांना कसे सामोरे जावे याची माहिती मिळावी.याकरता कामोठ्यातील माईन सीड या प्री प्रायमरी स्कूलने एक आगळावेगळा उपक्रम राबविला. विद्यालयातील बालवाडीतील ३० ते ३५ मुलांना कळंबोली अग्निशमन केंद्रास आज भेट घडवून दिली.

यावेळी अग्निशमक दलाने या चिमुकल्यांचे स्वागत करून त्यांना आग विझवण्याचे विविध प्रात्यक्षिक करून दाखविले. आग विझवताना वेगवेगळ्या कलाकृतीही सादर केल्यानंतर पाण्याचे विविध आकाराचे फवारे बघून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या आगळ्यावेगळ्या उपक्रमानेविद्यार्थी बेहद खुश झाले.या मुलांना अत्यंत जवळून अग्निशामक यंत्रणा कशी असते आगीचा बंब कसा असतो ते आग कशी विजवतात याची पाहणी करता आली.



# सीकेटी विद्यालयात पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नवीन पनवेल येथील सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयात इयत्ता सातवी ते दहाच्या विद्यार्थ्यांसाठी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यालयाच्या इयत्ता एकूण १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन सादरीकरण केले.



यातील उत्कृष्ट अशा २० प्रकल्पांचे अंतिम सादरीकरण करण्यात आले. त्यातून श्रुती चंद्रकांत पवार, रिषभ तानाजी देशमुख, मेहरिन नासिर मुल्ला असे प्रथम तीन क्रमांक निवडण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहणे म्हणून पनवेलच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका सुशीला घरत, इंग्रजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पर्यवेक्षिका वैशाली पारधी, इंग्रजी माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, माजी विद्यार्थी यांची उपस्थिती लाभली. सदर स्पर्धेचे परीक्षण करण्यासाठी ईश्वरी संतोष घोलप आणि आयुष पाटील हे परीक्षक म्हणून लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार रुचिता घोलप यांनी मानले.

# आधार कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड शिबिर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर मंडळ व युवाप्रेरणा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय आधार कार्ड व आयुष्यमान भारत कार्ड शिबिराचे आयोजन १३ व १४ डिसेंबर रोजी सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र, प्लॉट नंबर ५९, सेक्टर १९, ए.आर. पाटील हॉस्पिटलसमोर खारघर येथे करण्यात आले आहे. व्हॉट्सअपद्वारे नोंदणी करावी. ८५९१००९१९९ (आपले नाव, पत्ता, मोबाईल नं. आधार कार्डमधील बदल) अधिक माहितीसाठी आदित्य हातगे (९८२१८४६९७६), किरण पाटील (८१०८८९१९९९) यांच्याशी संपर्क साधून प्रभागातील सर्व नागरिकांनी याचा लाभ घ्यावा.

## संपादकीय

# तांदळाचे निमित्त!

भारताकडून अमेरिकी बाजारपेठेत कमी किमतीत मोठ्या प्रमाणात तांदूळ खपवला जात असल्याची तक्रार अमेरिकी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधीने केल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय तांदळावर दुप्पट आयातशुल्क आकारण्याचा गर्भित इशारा सोमवारी दिला, पण अमेरिकेला होणारी भारतीय तांदळाची निर्यात थांबल्याने भारताचे काहीही बिघडत नाही.

**भारताने अमेरिकेच्या बाजारपेठेत तांदळाचे 'डम्पिंग' करू नये. तसे केल्यास तांदळावर दुप्पट टेरिफ आकारला जाईल असे आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. सोमवारी व्हाइट हाऊसमध्ये ट्रम्प यांनी कृषी प्रतिनिधींशी चर्चा केली. त्यावेळी अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट आणि कृषीमंत्री ब्रूक रॉलिन्स हेही उपस्थित होते. इतर देश त्यांचा तांदूळ अमेरिकेच्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर आणत असल्याची तक्रार यावेळी एका कृषी प्रतिनिधीने केली. कुठले देश अमेरिकेत त्यांचा तांदूळ निर्यात करतात असे विचारल्यावर त्यांनी भारत, थायलंड आणि चीनचे नाव घेतले. पुर्तो रिको एकेकाळी अमरिकेच्या तांदळासाठी सर्वात मोठी बाजारपेठ होती, पण गेल्या अनेक वर्षांपासून अमेरिकेने पुर्तो रिकोला तांदूळ पाठवलेला नाही याकडे त्या कृषी प्रतिनिधीने ट्रम्प यांचे लक्ष वेधले. यावेळी ट्रम्प यांनी भारताबाबत विशेष चौकशी केली. भारताला असे करण्याची परवानगी का दिली? तांदळावर भारताला करातून सूट आहे का अशी विचारणा ट्रम्प यांनी केली असता त्यांच्या अर्थमंत्र्यांनी भारताबरोबर व्यापार कराराची बोलणी सुरू असल्याचे सांगितले. हे सारेच किती सूचक आहे! कर आकारल्याने या समस्या सुटतील. आम्ही त्याची काळजी घेऊ असे म्हणत ट्रम्प यांनी भारताला तांदळावरील कराचा गर्भित इशारा दिला. ट्रम्प यांनी याआधी भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयातशुल्क लावले आहेच हे इथे लक्षात घेतले पाहिजे. वास्तविक भारत हा जगभरातला सर्वात मोठा तांदूळ उत्पादक देश आहे. भारतात तब्बल १५ कोटी टन तांदळाचे उत्पादन होते. जगभरातील तांदळाच्या निर्यातीत भारताचा वाटा २८ टक्के आहे. गेल्या वर्षी भारताने अमेरिकेला २.३४ लाख टन तांदूळ निर्यात केला. हे प्रमाण भारताच्या एकूण तांदूळ निर्यातीच्या अवघे पाच टक्क्यांहूनही कमी आहे. म्हणजेच अमेरिकेला तांदूळ निर्यात करणे थांबवल्यास भारताचे फार मोठे नुकसान होणार नाही. हा एवढा तांदूळ भारत सहजच अन्य देशांमध्ये विकू शकेल. पण अमेरिकेत जगभरातून येत असलेल्या तांदळामध्ये भारतीय तांदळाचे प्रमाण मात्र २५ टक्क्यांच्या आसपास आहे. म्हणजेच अमेरिकेतील तांदूळ खरेदीदार भारतीय तांदूळ पसंत करतात. त्यातही बासमती तांदळाला विशेष मागणी आहे. जगभरातील इतरही अनेक देशांमध्ये भारतीय तांदळाला अशीच चांगली मागणी आहे. यात विशेषत: आखाती देश, युरोप व आफ्रिकी देशांचा उल्लेख करावा लागेल. अमेरिकेने भारतीय तांदळावर दुप्पट आयातशुल्क आकारल्यास भारताला आपला तांदूळ जगातील या भागांकडे विकण्याचा पर्याय आहे. पण अमेरिकेतील भारतीय तांदळाच्या ग्राहकांची मागणी ट्रम्प कशी पुरी करणार? कदाचित ते भारताकडून थेट तांदूळ न घेता अन्य देशांकडून भारतीय तांदळाची खरेदीही करतील. पण हे असे सगळे करण्याचे कारण काय असा प्रश्न कुणाला पडला असल्यास त्याचे सोपे उत्तर भारत-अमेरिका यांच्या दरम्यानच्या लांबलेल्या व्यापारविषयक वाटाघाटी हेच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या ताज्या भेटीची पार्श्वभूमीही ट्रम्प यांच्या या नव्या दबावतंत्राला आहे.**

# भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद



विश्वनाथन आनंद हा भारतीय बुद्धिबळपटू, आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर आणि माजी विश्वविजेता आहे. विश्वनाथन आनंद यांचा जन्म ११ डिसेंबर १९६९ रोजी झाला. त्याने पाच वेळा जागतिक बुद्धिबळ स्पर्धा जिंकली असून तो निर्विवाद विजेता ठरला आहे. विश्वनाथन आनंद २००३ FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपमध्ये जागतिक बुद्धिबळ बनला आणि त्यांच्या काळातील ड्रीड खेळाडू मानला जातो.

१९८८मध्ये विश्वनाथन आनंद भारताचा ग्रँडमास्टर झाला. भारतातील सर्वात सन्माननीय क्रीडा पुरस्कार (१९९१-९२) हा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार प्राप्त करणारा तो पहिला खेळाडू होता. २००७मध्ये त्याला पद्मविभूषण हा भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला, ज्यामुळे हा पुरस्कार प्राप्त करणारा तो भारतीय इतिहासातील पहिले खेळाडू ठरला. आनंदने सहा वेळा (१९९७, १९९८, २००३, २००७, २००८) बुद्धिबळ ऑस्कर जिंकला आहे.

विश्वनाथन आनंदला भारतीय बुद्धिबळाचा बादशहा म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. सन २०००मध्ये तो केवळ भारताचाच नव्हे, तर आशियातील पहिला बुद्धिबळ विश्वविजेता ठरला. १८८६मध्ये विजेते ठरलेल्या विल्हेल्म स्टेन्झ या पहिल्या विश्वविजेत्याचे विचार केल्यास आनंद हा १५वा विश्वविजेता ठरला. २४ डिसेंबर २००० रोजी तेहरान येथे झालेल्या चॅम्पियनशिपमध्ये त्याने सहा खेळांच्या चौथ्या सामन्यात रशियन वंशाचा स्पॅनिश प्रतिस्पर्धी अलेक्सई शिरोवचा पराभव करून जागतिक विजेतेपद पटकावले. अशा नेत्रदीपक विजयाची पुनरावृत्ती विश्वविजेतेपदाच्या सामन्यात होणे कदाचित कठीण आहे. हा सामना जिंकल्यावर आनंदला ६,६०,००० डॉलरचे बक्षीस मिळाले.

२००२मध्ये विश्वनाथन आनंदने जागतिक स्तरावर चौथे यश मिळवून पुन्हा एकदा नवा इतिहास रचला. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या कोर्सिका खुल्या बुद्धिबळ स्पर्धेतील पहिल्या गेममध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर आनंदने रशियाच्या अनोतोली कार्पोसचा पराभव करत अंतिम सहाव्या गेममध्ये विजय मिळवला. २००२मध्ये आनंदने मे महिन्यात प्रागमध्ये युरोटेल विजेतेपद, जुलैमध्ये बुद्धिबळ क्लासिकचे मैन्ज विजेतेपद जिंकले. त्यानंतर ऑक्टोबरमध्ये हैदराबाद येथे होणाऱ्या विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत पुन्हा आपले वर्चस्व सिद्ध केले आणि पुन्हा विश्वचषक विजेतेपद सिद्ध केले. त्याला ४६,००० डॉलरची बक्षीस रक्कम मिळाली.

जागतिक चॅम्पियनशिपची विभागणी होत असताना आनंदने २००० ते २००२पर्यंत FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. तो २००७मध्ये निर्विवाद जागतिक चॅम्पियन बनला आणि २००८मध्ये व्लाडामीर क्राम्निककडून त्याच्या विजेतेपदाचा बचाव केला. त्यानंतर त्याने २०१०मध्ये वेसेलिन तपोलाएवविरुद्ध त्याचे विश्व चॅम्पियनशिपचे विजेतेपद यशस्वीरित्या जिंकले आणि २०१२मध्ये पुन्हा जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप जिंकली. जी बोरिस गल्फविरुद्ध होती. २०१३च्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिपमध्ये मागनुस कार्सलेनविरुद्ध त्याचा पराभव झाला होता.

विश्वनाथन आनंद हा इतिहासातील नऊ खेळाडूंपैकी एक आहे ज्यांनी FIDE जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप यादीत आपला जुना विक्रम मोडला आणि संपूर्ण २१ महिने जागतिक क्रमांक १चा खेळाडू राहिला. आणि ते आपल्या आयुष्यात सहा वेळा या ठिकाणी राहिला. १९८८मध्ये विश्वनाथन आनंद भारताचा पहिला ग्रँडमास्टर बनला. .

विश्वनाथन आनंदने ग्रँडमास्टर बनून भारताची गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवली. त्याचा जन्म दक्षिण भारतात १९६९मध्ये झाला. वयाच्या १७व्या वर्षी त्याने ग्रँडमास्टरची पदवी संपादन केली. वयाच्या २७व्या वर्षी तो जगातील नंबर २ खेळाडू बनला. १९८८मध्ये त्याने हे विजेतेपद मिळवले. लियेनेर्स अंतर्राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत आनंदला सातवे स्थान मिळाले. याच स्पर्धेत त्याने विश्वविजेता कारपोरोव आणि ब्रिटनच्या जनाथन स्पीलमैनचा पराभव केला.

विश्वनाथन आनंद हे धारदार खेळाडू आहे. त्यांच्या चाली फारशा गुप्त नसतात, तरीही ते त्यांच्या प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणतात आणि त्याला चुका करण्यास भाग पाडतात. त्यांना त्यांच्या चालींसाठी जास्त वेळ लागत नाही. ते पारंपरिक शैलीत खेळतात. क्रिकेटमध्ये जसे सचिन तेंडुलकर आहे तसे बुद्धिबळात विश्वनाथन आनंद आहे.

मुंबईतील 'ए' राष्ट्रीय स्पर्धा जिंकून आनंदने आपली प्रतिभा सिद्ध केली. या चॅम्पियनशिपमध्ये त्याला वयाच्या १६व्या वर्षी FIDAद्वारे मान्यताप्राप्त १५ खेळाडूंपैकी FIDA रेटिंग मिळाले. आनंदने वयाच्या पाचव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. पालकांकडून युक्त्या शिकल्या. १९८२मध्ये त्याने ज्युनियर चॅम्पियनशिपची राष्ट्रीय स्पर्धा जिंकली.

२०००मध्ये आनंदने FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप जिंकली. २००७च्या वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर तो बुद्धिबळाचा निर्विवाद राजा बनले. १४ ते २९ ऑक्टोबर २००८ दरम्यान झालेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत व्लादिमीर क्रॅमनिकचा पराभव करून त्याने आपले विजेतेपद कायम राखले. या विजयासह तो नॉकआऊट, टूर्नामेंट आणि मॅच अशा तीन वेगवेगळ्या फॉरमॅटमध्ये चॅम्पियनशिप जिंकणारा जागतिक बुद्धिबळ इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे. वाणिज्य शाखेतील पदवीधर असलेल्या विश्वनाथन आनंदला अभ्यासाव्यतिरिक्त पोहणे आणि संगीताची खूप आवड आहे.

आनंद २०००मध्ये FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप जिंकणारे पहिला भारतीय बनला. सहा वेळा बुद्धिबळ ऑस्कर जिंकला. २००७ आणि २००८मध्ये तो जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन होते. आनंद आतापर्यंत पाच वेळा विश्व बुद्धिबळ चॅम्पियन बनला आहे. २००० साली प्रथमच विश्वविजेता बनलेला आनंद २००७पासून आजपर्यंत (२०१२) सलग चार वेळा विश्वविजेता आहे.

विश्वनाथन आनंदला भारत सरकारने क्रीडा क्षेत्रात अर्जुन पुरस्कार (१९८५), पद्मश्री (१९८७), पद्मभूषण (२०००), पद्मविभूषण (२००७), राजीव गांधी खेलरत्न (१९९१-१९९२) देऊन सन्मानित केले.

(साभार : इंटरनेट)

# बालसाहित्यिक, चरित्रकार व कवी राजा मंगळवेढेकर

राजा मंगळवेढेकर ऊर्फ वसंत नारायण मंगळवेढेकर हे थोर बालसाहित्यिक, चरित्रकार व कवी होते. त्यांचा जन्म ११ डिसेंबर १९२५ रोजी झाला. त्यांनी बीएपर्यंतचे शिक्षण घेतले होते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग होता.'साने गुरुजी जीवनचरित्र' हा त्यांचा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ आहे.

त्यांचे संपूर्ण लेखन 'राजा मंगळवेढेकर' याच टोपणनावाने प्रसिद्ध आहे. राष्ट्रसेवादल, साने गुरुजी कथामाला, आंतरभारती इत्यादी सांस्कृतिक कार्य करणार्या संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. कथाकथन, बालमेळावे, शिबिरे इत्यादींच्या निमित्ताने त्यांनी भारतभर भटकंती केली. या अनुभवविश्वातून त्यांची अनेक पुस्तके आकारास आली आहेत.

कथाकथनांमधून बालगोपाळांची मने जिंकणाऱ्या राजा मंगळवेढेकरांनी बालवाचकांसाठी अनेक पुस्तकेही लिहिली आहेत. त्यांचे बहुतांश लेखन चरित्रे, वृक्ष, निसर्ग व विज्ञान या विषयांवर आधारित आहेत.

आनंद गोष्टी, माझ्या आवडत्या गोष्टी, रंगीत फुगे, सरदारजीच्या गोष्टी, शहाणे गाढव, श्रीकृष्णाच्या चातुर्यकथा, झाडांची गाणी-झाडांच्या गोष्टी, अखेरची झुंज, आपले पुष्पमित्र, आपले वनमित्र, आठवणीतील अण्णा-गदिमा, भले बुद्धीचे सागर नाना, भूमिपुत्र, बिनभिंतीची उघडी शाळा, बिरबलचे भाईबंद, चिंतूची करामत आणि मनीची फजिती, ज्ञानेश्वरीतील कथा, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, इंदिरा गांधी, भारुड, गांधीजींच्या गोष्टी, पंडित जवाहरलाल नेहरू, राष्ट्रपिता गांधी, शिक्षक मित्रांनो अशी त्यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत.

१९८५ साली पुण्यात भरलेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवाहरलाल नेहरू समिती पुरस्कार, गदिमा पुरस्कार, बालसेवा पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले होते. राजा मंगळवेढेकर यांचे १ एप्रिल २००६ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)




## भारतीय गुगलवर का सर्च करताहेत ५२०१३१४?

इंटरनेटच्या युगात दररोज नवीन शब्द आणि ट्रेंड उदयास येतात, त्यापैकी काही खूपच वेगळे आणि मनोरंजक आहेत. २०२५ मध्ये गुगलवर सर्वाधिक शोधल्या गेलेल्या शब्दांपैकी एक ७-अंकी नंबर होता तो म्हणजे ५२०१३१४.



आश्चर्याची गोष्ट म्हणजे डीराशिवश आणि चरूवरू सारख्या गंभीर शब्दांमध्येही हा नंबर गुगलच्या टॉप सर्च लिस्टमध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी झाला. म्हणूनच इंटरनेटशी आणि विशेषतः रिलेशनशिप ट्रेंड्स माहित नसलेल्या लोकांसाठी हा नंबर म्हणजे एक रहस्य आहे.

दरवर्षी, गुगल त्यांचे धशरी ळप ड्शरीलह फीचर जारी करतं, जे वर्षभरात सर्वाधिक शोधले जाणारे शब्द सांगतं. यामध्ये ट्रेंडिंग न्यूज, पॉप कल्चर, टेक्नॉलॉजी आणि सामान्य लोकांच्या आवडीचे विषय समाविष्ट आहेत.

२०२५मध्ये युद्ध, तणाव, सीजफायर आणि मॉक ड्रिलसारखे शब्द मोठ्या प्रमाणात शोधले जात असताना, प्रेम आणि भावनांशी संबंधित ५२०१३१४ या नंबरचा अर्थ जाणून घेण्यातही लोकांनी खूप रस दाखवला.

### ५२०१३१४ म्हणजे काय?

गुगलवरचा ट्रेंडिंग नंबर ५२०१३१४ हा एक चिनी इंटरनेट स्लँग आहे. या ७-अंकी नंबरचा अर्थ मी आयुष्यभर तुझ्यावर प्रेम करतो किंवा करते. याचाच अर्थ तो फक्त एक नंबर नाही तर प्रेमाची डिजिटल भाषा आहे.

हा ट्रेंड सोशल मीडियाद्वारे भारतातही पोहोचला, विशेषतः तरुणांमध्ये. आजच्या युगात, ग्लोबल स्लँग आणि ट्रेंडचा वेगाने प्रसार झाल्यामुळे हा चिनी नंबर भारतातही जोरदार व्हायरल होत आहे.

नंबरद्वारे प्रेम व्यक्त करणं हा नवीन ट्रेंड नाही. भारतात १२३ = आय लव्ह यू हा ट्रेंड तरुणांमध्ये आधीच खूप लोकप्रिय आहे. त्याचप्रमाणे ५२०१३१४ हादेखील डिजिटल लव्ह कल्चरचा एक भाग बनला आहे, जिथे भावना व्यक्त करण्यासाठी नंबरने शब्दांची जागा घेतली आहे.

हा स्लँग पूर्वी चीनपुरता मर्यादित होता, परंतु सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे तो आता जगभर पसरला आहे. भारतातही रिलेशनशिप स्टेटस, रील्स आणि चॅटमध्ये या नंबरचा वापर झपाट्याने वाढला आहे. सध्या त्याची जोरदार चर्चा सुरू आहे.

# कादंबरीकार पुरूषोत्तम देशपांडे



## निमित्त

मराठी कादंबरीकार, तत्त्वचिंतक व राजकीय कार्यकर्ते. जन्म अमरावती येथे. १९२५ साली ते मंबई विद्यापीठाचे एम्. ए. झाले आणि पुढे एलएल. बी.ची पदवी त्यांनी नागपूर विद्यापीठातून १९२६ साली घेतली. १९२५ मध्ये त्यांचे कोल्हटकर घराण्यातील विमलाबाईंशी लग्न झाले. १९३१ साली वऱ्हाडच्या 'यूथ लीग' चे ते अध्यक्ष होते. प्रांतिक काँग्रेस कमिटीचे ते चिटणीस होते (१९३४). गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीत त्यांनी १९२१ साली भाग घेतला एक वर्ष कॉलेज सोडले. १९३२ च्या आंदोलनात त्यांना कारावास घडला. १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत भाग घेतल्याबद्दलही त्यांना कारावास भोगावा लागला होता. मध्य प्रदेशाच्या इंटक शाखेचे ते अध्यक्ष होते.

भवितव्य नावाचे साप्तहिक त्यांनी १९४१ साली चालू केले. नागपूर येथे ते वकिलीचा व्यवसाय करीत. वैदिक वाङ्मय व विशेषतः बौद्ध साहित्य यांचे ते व्यासंगी अभ्यासक आहेत. विद्यालयीन कालात रामकृष्ण परमहंस, विवेकानंद व विशेषतः स्वामी रामतीर्थ यांच्या वाङ्मयाचा फार मोठा ठसा त्यांच्या विचारांवर उमटला. ते १९३३ ते १९४२ सालापर्यंत मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. तथापि त्यांची निष्ठा गांधीवादावरच अधिकाधिक बसत गेली. गांधीजीच का ?(१९४४) ह्या ग्रंथात गांधीजींना लाभलेल्या माहात्म्याची मीमांसा त्यांनी केली आहे. आधुनिक विचारप्रणालीचा त्यांचा व्यासंग सखोल होता तथापि अंतर्मुख वृत्ती, चिंतनशीलता आणि ब्रह्मज्ञानाची आवड यांमुळे जीवनविषयक सखोल विचार करण्याची त्यांची प्रवृत्ती होती.

त्यांच्या साहित्यात बंधनाच्या पलीकडे (१९२८), सुकलेले फूल (१९३१), सदाफुली (१९३३), विशाल जीवन (१९३९), काळी राणी (१९४१), नवे जग (१९४१), आहुती (१९५९) व मेरी घोष की धर्मघोष ?(१९७२) या कादंबऱ्या नवी मूल्ये (१९४६) हा निबंधसंग्रह निर्माल्यमाला (१९३३) ह्या कविता आणि साहित्यअकादेमीचे १९६२ सालचे पारितोषिक मिळालेले अनामिकाची चिंतनिका हे तात्त्विक पुस्तक यांचा अंतर्भाव होतो. त्यांच्या कादंबऱ्यांत व्यक्ती आणि तिच्या अंतर्मनातील संघर्ष यांच्यावर भर आहे. फडके-खांडेकरांच्या कादंबरी-युगात वेगळी उठून दिसणारी अशी त्यांची कादंबरी आहे. तिच्यात अत्यंत प्रगल्भ व्यक्तिमनांचे तात्विक, वैचारिक, भावनिक स्वरूपाचे मूलभूत प्रश्न आधुनिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या तरलपणाने व हळुवारपणाने चित्रित करण्याचा प्रयत्न आहे. एक प्रकारची बंडखोर पण चिंतनशील स्वच्छंदतावादी वृत्ती त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमागे जाणवते. काही तांत्रिक प्रयोगही देशपांड्यांनी केले आहेत. सुकलेले फूल व सदाफुली या त्यांच्या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात.

ह्यांखेरीज भारतीय संस्कृतीला आव्हान व सोव्हिएट रशिया आणि हिंदुस्थान (१९४४) हे त्यांचे ग्रंथही उल्लेखनीय आहेत. ह्यांपैकी दुसऱ्या ग्रंथात 'सोव्हिएट रशियाची विपरीत करणी, मार्क्सवादाचे देहावसान' आदी विषय विवेचिले आहेत. अनुभवामृत रसरहस्य (३ खंड, १९६२-६५) हे त्यांनी ज्ञानदेवांच्या अनुभवामृतावर केलेले एक नवे निरूपण. ज्ञानदेवांचे एक चरित्रही त्यांनी इंग्रजीत लिहिले आहे. पतंजलीच्या योगसूत्रांवर एक अभिनव भाष्य करण्याच्या उद्देशाने लिहिलेले द ऑथेंटिक योग हे त्यांचे पुस्तक इंग्लंडमध्ये प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्याचा जर्मन अनुवाद १९७६ साली जर्मनीत प्रसिद्ध झाला. विदर्भ साहित्य संघ व इतरही वाङ्मयीन संस्थांचे अध्यक्षपद त्यांना लाभले होते.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

## चित्र रंगवा




## आरोग्य प्रहर

### निरोगी आरोग्यासाठी सकाळी उठल्यानंतर 'हे' करा

सरते २०२४ हे वर्ष तुम्हालादेखील रात्री उशिरा झोपणे आणि सकाळी उशिरा उठणे, व्यायाम न करणे तसेच सतत मोबाइलवर रील्स पाहणे या सर्व गोष्टींमध्ये गेले असेल, तर या सर्व वाईट सवयी सोडून येणाऱ्या नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या सवयींपासून करा.



होमियो अमीगोचे संस्थापक आणि सीईओ करण भार्गव यांनी सकाळच्या दिनचर्येत समाविष्ट करण्यासाठी खाली काही सवयी शेअर केल्या आहेत.

तुमच्या ठराविक वेळी जागे व्हा : तुमच्या नैसर्गिक सर्केडियन लयांशी ताळमेळ वाढल्याने तुम्हाला विश्रांती आणि सतर्कता जाणवते, फोकस आणि कार्यक्षमता वाढते.

शरीर हायड्रेट करा : झोपेतून उठल्यावर पाणी प्यायल्याने तुमचे शरीर रिहायड्रेट होते आणि तुमचे चयापचय सुरू होते.

शारीरिक हालचाली करा : सकाळचा व्यायाम रक्ताभिसरण, मनःस्थिती आणि उर्जेची पातळी वाढवतो, तुम्हाला दिवभराच्या कामासाठी ऊर्जा देतो.

ध्यानाचा सराव करा : काही मिनिटांच्या ध्यानामुळे तणाव कमी होतो आणि मानसिक स्पष्टता सुधारते.

दिवसभराचे नियोजन करा : कामाचे नियोजन दिवसभराच्या कार्यांना प्राधान्य देते आणि यामुळे वेळेचे व्यवस्थापन सुधारते.

पौष्टिक नाश्ता करा : संतुलित जेवणामुळे आवश्यक ऊर्जा मिळते आणि एकाग्रता सुधारते.

स्क्रीन वेळ मर्यादित करा : मोबाइलवर जास्त वेळ वाया घालवणे टाळा. यामुळे वेळही वाचेल आणि तणावही दूर होईल.

कृतज्ञता व्यक्त करा : आपण ज्या गोष्टींसाठी कृतज्ञ आहात, त्याबद्दल विचार केल्याने सकारात्मक दृष्टिकोन वाढतो आणि तणाव कमी होतो.

सर्वात महत्त्वाचे काम आधी संपवा : तुमचे सर्वात महत्त्वाचे कार्य लवकर संपवा, ज्यामुळे ते चांगल्या प्रकारे पूर्ण होते.

सकाळी उठल्यानंतर आपण सर्वात पहिले जी कामे करतो त्यावरच आपला संपूर्ण दिवस कसा जाईल हे अवलंबून असते. जसे की आपण सकाळी उठल्यावर सर्वप्रथम योगा, मेडिटेशन, व्यायाम किंवा मॉर्निंग वॉक अशा काही ॲक्टिव्हिटीज केल्या की आपला संपूर्ण दिवस अगदी आनंदात आणि मजेत जातो तसेच यामुळे आपल्याला दिवसभर फ्रेशदेखील वाटते. जर दिवसाच्या सुरुवातीलाच आपले मन, शरीर आणि आत्मा आपल्याला प्रसन्न करायचे असेल, तर सकाळी उठल्यानंतरचे आपले रूटिनही तसेच ठेवायला पाहिजे.

# ध्वज दिनी निधी संकलन मोठे देशकार्य -जिल्हाधिकारी किशन जावळे



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

देशाच्या सीमेचे रक्षण करण्यासाठी सैनिक कायम कार्यरत असतात. या सैनिकांच्या मदतीसाठी ध्वज दिन निधी संकलन करणे हे एक मोठे देशकार्य आहे. त्यामुळे हे देशकार्य जास्तीत जास्त जनतेपर्यंत पोहोचून सैनिकांसाठी भरघोस निधी जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालययातील राजस्व सभागृह येथे आज यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजदिन निधी संकलन शुभारंभ-२०२५ करण्यात आले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी सुनिल थोरवे, अपर पोलीस अधिक्षक अभिजित शिवथरे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड सुनिल इंदलकर, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कर्नल राहुल माने (निवृत) आदि उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, १९४९ पासून, ७ डिसेंबर हा दिवस देशभरात सशस्त्र सेना ध्वज दिन म्हणून साजरा केला जातो. शहीद आणि गणवेशधारी सैनिकांना आदरांजली वाहण्यासाठी, ज्यांनी देशाच्या सन्मानाचे रक्षण करण्यासाठी आपल्या सीमेवर शौर्याने लढा दिला आणि लढत राहिले, त्यांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. सैनिक हे कोणत्याही देशाच्या सर्वात मोठ्या संपत्तीपैकी एक असतात. ते राष्ट्राचे रक्षक असतात आणि कोणत्याही परिस्थितीत नागरिकांचे रक्षण करतात. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी, सैनिकांनी त्यांच्या आयुष्यात खूप काही बलिदान दिले आहे. मातृभूमीच्या सेवेत आपले प्राण अर्पण करणाऱ्या या शूर वीरांचा देश कायम ऋणी आहे. आपले कर्तव्य आहे की, आपण केवळ कर्तव्य बजावताना जखमी झालेल्या शहीद आणि जिवंत वीरांबद्दल आदर व्यक्त करू नये तर या बलिदानाचा महत्त्वाचा भाग असलेल्या त्यांच्या कुटुंबांबद्दलही आदर व्यक्त करू. केंद्र आणि राज्य पातळीवरील सरकारी उपाययोजनांव्यतिरिक्त, काळजी, आधार, पुनर्वसन आणि आर्थिक मदत देण्यासाठी आपले/तिचे निः स्वार्थ आणि स्वेच्छेने योगदान देणे, हे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचे सामूहिक कर्तव्य आहे. ध्वज दिन आपल्या युद्धात अपंग असलेल्या सैनिकांची, वीर नारींची आणि देशासाठी बलिदान देणाऱ्या शहिदांच्या कुटुंबांची काळजी घेण्याची आपली वचनबद्धता आपण पूर्ण करायला हवी. भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहूती देऊन सर्वोच्च बलिदान दिले अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडीअडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी तसेच युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी या निधीचा वापर केला जातो.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली आणि ध्वजदिन निधीत सहभाग देणाऱ्यांकडून निधी संकलित करण्यात आला. यावेळी शासकीय कर्मचारी निवृत्त जवान उपस्थित होते.

## ऋषिकेश माळीकडून 'कळसूबाई' सर

**म्हसळा : प्रतिनिधी**



महाराष्ट्राचे 'माऊंट एव्हरेस्ट' म्हणून ओळखले जाणारे १६४६ मीटर उंच कळसूबाई शिखर रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील सेरेब्रल पाल्सी (मेंदूचा पक्षाघात) असलेल्या ऋषिकेश सुदाम माळी (वय २२) या युवकाने धैर्य, चिकाटीने सर केले. याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शौर्य दिन रक्तदान शिबिरात ६४ जणांचे योगदान

**कर्जत : प्रतिनिधी**

शौर्य दिन आणि श्रीमद भागवत गीता जयंती निमित्त विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गावाहिनी व समर्थ सेवा मंडळ नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

नेरळ येथील धारप सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उदघाटन रायगड हॉस्पिटल व रिसर्च सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुशाग्र पटेल बजरंग दलाचे प्रदेश पदाधिकारी अँड दिपक गायकवाड, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या शुभ हस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आले. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद कुलाबा जिल्हा सहमंत्री संग्राम आलदर, विकास सहमंत्री प्रसन्न खेडकर, मातृशक्ति संयोजक मीनाक्षी अग्रवाल, अमोल सूर्यवंशी, साईनाथ श्रीखंडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी अक्षय सुरेश लाड यांनी वैयक्तिक २५वे रक्तदान केले.

रक्तसंकलनाचे काम बदलापूर येथील माया रक्तकेंद्राचे बिपीन पालकर, आकांक्षा गोळे, प्रज्ञा काशिद, आयान शेख, सानिया शेख, गौरव साळुंखे यांनी केले. याप्रसंगी नरेश मसणे, किरण ठाकरे, मंगेश म्हसकर, अँड. प्रसन्न खेडकर दिलीप कवाडकर मनिष भगत, सुशांत म्हसे, सुशांत भगत, संकेत कराळे, गणपत कालेकर, भावेश भगत, अक्षय महाले, प्रज्वल सूर्यवंशी, अन्वय मांडके आदी उपस्थित होते.



## कळमशेत ग्रामस्थांचा बाहेरील व्यक्तीस व परप्रांतियांना जमीन न देण्याचा ठराव



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील कलमशेत ग्रामस्थ व मुंबई मंडळाने क्रांतिकारी निर्णय घेतला असून गावची जमीन बाहेरील व्यक्ती व परप्रांतीयांना न विकण्याचा ठराव गावस्तरावरमंजूर करण्यात आला आहे. ७ डिसेंबर २०२५ रोजी गावकरी व मुंबईकर सर्व कुटुंबातील युवक गावी येऊन संयुक्त बैठक घेण्यात आली त्यामधे हा निर्णय घेताना सांगितले की गेल्या काही वर्षांपासून गावातील काही शेतकरी आपल्या आर्थिक लाभासाठी परप्रांतीयांना जमीन विकत आहेत. त्यामुळे या जमीनीवर कपांऊड तयार करुन इतर शेतकरी बांधवांना रस्ता सुद्धा मिळत नाही.ही परिस्थिती ओढावत आहे. त्यामुळे ग्रामस्थ व परप्रांतीय यांच्यात वाद होत असतात. या सर्वबाबींचा विचार केला व त्यामुळे आम्ही हा निर्णय घेऊन परप्रांतीयांना शेतजमिनी न विकण्याचा निर्णय घेतला असून तसा ठराव करून गावा बाहेरील अगर परप्रांतीयांना व्यक्तीच्या लाभात महसूल तालुका कार्यालयाकडे मौजे कलमशेत येथील खरेदी खत बक्षीस पत्र कोणतेही मालकी हक्क हस्तांतरित होणारे दस्तमहसूल दप्तरी नोंदणी करु नये अशा आशयाचे पत्र तळातहसीलदार यांना देण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे असे निवेदन या ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग, पोलीस निरीक्षक तळा,तहसीलदार कार्यालय, दुय्यम निबंधक तळा, तलाठी सजा कार्यालय, सरपंच ग्रुप ग्रामपंचायत सोनसडे, यांना रवाना केले आहेत. या कामी मुंबई अध्यक्ष महादेव कुंभेकर,उपाध्यक्ष चंद्रकांत वतारे,उपाध्यक्ष प्रभाकर खांडेकर, सेक्रेटरी मंगेश शेंपुडे, उप सेक्रेटरी केशव बाईत,खजिनदार महादेव करण, मंगेश शेंपुडे, तसेच गाव अध्यक्ष जानू अडखळे,उपाध्यक्ष हिराजी खांडेकर, सेक्रेटरी पांडुरंग किंजळे,खजिनदार भागोजी कुंभेकर यांच्या सारख्या कार्यकर्त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे गावातील शेतकरी बांधवाच्या जमीन वाचतील अशी आशा गावकरयानीं पाठिंबा दर्शवत व्यक्त केल्या आहेत.

गावातील माहेरवासीयानी यासाठी या निर्णयाला पाठींबा दयावा आणि आपल्या वडिलोपार्जित जमिनी वाचवण्यासाठी गावाला सहकार्य करावे असे आवाहन मुंबई कमेटी अध्यक्ष महादेव कुंभेकर यांनी केले आहे.

# आंबा, काजू आणि उर्वरित महाराष्ट्रातील संत्रा पिकासाठी विमा योजना

## हफ्ता भरण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

आंबा फळपिका करिता प्रति हे. रक्कम रु. १४ हजार ४५०/- व काजू फळपिका करिता प्रति हे. रक्कम रु. ६,०००/-इतका विमा हप्ता आहे. गारपीट या हवामान धोक्यापासून विमा संरक्षासाठी अतिरिक्त विमा हप्ता आंबा फळपिका करिता रक्कम रु. ४,८४५/- व काजू फळपिका करिता रक्कम रु.२,०००/- तरी विमा हप्ता भरण्यासाठी शेतकऱ्यांनी बँक, किंवा पीक विमा पोर्टल https://pmfby.gov.in, येथे सुविधा उपलब्ध आहे. कोकण विभागातील आंबा, काजू आणि उर्वरित महाराष्ट्रातील संत्रा पिकासाठी फळपीक विमा योजनेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ असा होता. परंतु आता योजनेत भाग घेण्यासाठी केंद्र शासनाने दि.१५ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. सर्व शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

शासनाने आंबा व काजू पिकांसाठी पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजना दि. १२ जून २०२४ च्या शासन निर्णयान्वये सुरु केलेली आहे. रायगड जिल्ह्याकरिता युनिव्हर्रसल सम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि. अंधेरी मुंबई ही कंपनी नेमलेली आहे. या अंतर्गत नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकुल परिस्थितीमुळे फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण मिळते. कर्जदार तसेच बिगर कर्जदार शेतकऱ्यांना अधिसुचित क्षेत्रातील अधिसुचित पिकांसाठी (आंबा व काजू) योजना ऐच्छिक आहे.

बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी विहित नमुन्यातील विमा प्रस्ताव पत्रक पूर्णतः भरुन ई-पिक पाहणी करुन फळ बागेची नोंद असलेला ७/१२ उतारा, आधारकार्ड, फळ पिकाची बाग उत्पादनक्षम असल्याबाबत स्वयंघोषणापत्र फळ बागेचा । फोटो व विमा हप्त्याची रक्कम आपले बँक खाते असलेल्या बँक शाखेत, वि.का.स.सेवा सोसायटीत अथवा सीएससी केंद्रात अंतिम मुदतीपूर्वी जमा करावी.

विमा संरक्षण केवळ उत्पादनक्षम फळबागांना लागू राहील यासाठी आंबा पिकाचे उत्पादनक्षम वय ५ वर्ष व काजु पिकाचे उत्पादनक्षम वय ५ वर्ष आहे. योजनेत सहभागासाठी कोकण विभागाकरिता एक फळ पिकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे व जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा हि सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रति शेतकरी ४ हेक्टर मर्यादा पर्यंत राहील.


**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

पत्ता- मुख्यालय इमारत, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल- ४१०२०६ दुरध्वनी क्र- ०२२-२७४५८०४०/४१/४२
Email Id: panvelcorporation@gmail.com

**निविदा प्रसिद्ध करणेकामी**

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| 1. | Tender No: PMC/IT/16/2025 | पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्र. ०१ दि. बा. पाटील शाळामध्ये सभागृहात ऑडिओ व्हिज्युअल पायाभूत सुविधा स्थापन करणेबाबत. |

या ई-निविदेबाबतची विस्तृत माहिती शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २०/११/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.६८६/७१०/२०२५
दिनांक : १०/१२/२०२५

सही/-
उप आयुक्त (मातंवि)
पनवेल महानगरपालिका



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

**पर्यावरण विभाग**

पनवेल महानगरपालिकेमार्फत नोंदणीकृत व अनुभव संस्थांकडून माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना विविध माध्यमांद्वारे पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा (E-Pledge) घेण्यासाठी प्रोत्साहित करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेकरिता जाहीर सूचनेद्वारे दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/
प्र.क्र.६८०/७०४/२०२५
दिनांक : १०/१२/२०२५

सही/-
उप आयुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल प्रतिक प्रकाश पोटे, आकाश प्रकाश पोटे दोघे रा. सेक्टर नं.६, प्लॉट नं.१०, खारघर ४१०२१० व सिध्देश विश्वास पोटे रा. प्लॉट नं. २६/२७, सेक्टर नं.०१, खांदा कॉलनी, न्यू पनवेल वेस्ट ४१०२०६ हे खालील सामाईक वर्णनाची मिळकत मिळकतींचे विद्यमान मालक बबन महादु पाटील, रा. घर नं.९८, तळोजे पंचायत, तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८ व तुकाराम महादु पाटील, रा. घर नं.१०२ बी, वामबाबा मंदिराजवळ, तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०८ यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे-तळोजे मजकूर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं/सर्व्हे नं / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी | | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| १४ | | ०-४९-०० | ८.४४ |
| | पोटखराबा | ०-०६-६० | |
| | एकूण | ०-५५-६० | |
| | अविभक्त हिश्श्यापैकी | ०-३०-०० हे. आर | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकाने आमचे अशिलांस दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली.
दिनांक : ११/१२/२०२५

सही/-
ॲड. स्नेहल विजयकुमार बजाज
ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी
मु. पो. पाली, ता.सुधागड,
जि. रायगड पिन ४१०२०५
८८६२०३५२०३



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे- मोहो, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट.नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ३७/२ | ०-०३-५० | ०.६० | वसंत हिरू भोईर |
| | ०-०४-५० | ०.७७ | बुधाजी हिरू भोईर |
| एकूण | ०-०८-०० | | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. १०/१२/२०२५.

सही/-
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. ता. पनवेल जि. रायगड, मो.क्र. : ९९३०३६९८६१



प्रोसेफ फी जमा रू

अर्जदारातर्फे वकील
सोनिया नारायण शिरसाठ

**जाहीर नोटीस**
**मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल यांचे न्यायालयात**

विवाह याचिका क्र. ६९५/२०२१
नि.क्रं. ८/ड
ने. ता १५/१२/२०२५

सौ. पल्लवी अमित कांबळे ........अर्जदार
विरूध्द
श्री. अमित लक्ष्मण कांबळे ..........सामनेवाले

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

ज्या अर्थी अर्जदार सौ. पल्लवी अमित कांबळे हिने सामनेवाले श्री. अमित कांबळे यांच्याविरूध्द विवाह याचिका हिंदू विवाह कायदा कलम १३ (१) प्रमाणे विवाह विच्छदेनाकरिता मे. दिवाणी न्यायाधिश यांचे न्यायालयात पनवेल येथील कोर्टात याचिका दाखल केलेली असून सदर याचिका सन २०२१ दाखल केल्यापासून मा. न्यायालयासमोर प्रलंबित असून आजतागत सामनेवाले हे सदर याचिका मध्ये स्वतः अथवा किंवा त्यांच्या वकीलामार्फत हजर झालेले नाही सामनेवाले यांना जो शेवटचा पत्ता म्हणजेच आसुडगांव, खांदा कॉलनी येथील असून तेथे आपण/सामनेवाले राहवायांस नाहीत असा निशाणी ६ड बेलिफ रिपोर्ट मा. न्यायालयाच्या बेलिफ यांनी दिला आहे त्यामुळे अर्जदार यांना नाईलाजस्त सामनेवाले यांच्या विरूध्द सदरचा 'रामप्रहर' या दैनिक वृत्तपत्रांत जाहीर नोटीस प्रसिध्द करण्याचा हुकूम मागितल्यानंतर मा. न्यायालयांच्या आदेशाप्रमाणे सदरची पेपर नोटीस अर्जदार / तमाम नागिरकांना प्रासिध्द करीत आहोत.

याद्वारे तुम्हास फर्मविण्यात येते आहे की, तुम्ही सदर अर्जाविरूध्द कारण दाखवण्यकरिता दिंनाक १५/१२/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा. न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ठ केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाचे एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
तुम्हास अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ठ केलेल्या दिंनाकास किंवा त्यापुर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणर नाही.

आपण नमूद तारखे १५/१२/२५ रोजी मा. न्यायालयात हजर नाही झाल्यास तर अर्जदार हे आपल्या विरूध्द एकतर्फे हूकूम मिळविण्यासाठी मा. न्यायालयात विंनती करून आपलयाविरूध्द एकतर्फे हुकूम घेतील यांची नोंद घेतली.

आज दिनाक ०५/१२/२०२५ रोजी माझी सही न्यायालयाच श्क्कियासह दिली

कोर्टचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक

# नवी मुंबई वर्षभरात २१४६ किलो प्लास्टिक जप्त

## ११ महिन्यांत २० लाख ६५ हजारांचा दंडही वसूल

**नवी मुंबई : बातमीदार**

प्लास्टिकमुळे पर्यावरणाला आणि मानवी जीवनाला पोहचणारा धोका लक्षात घेऊन एकल वापर प्लास्टिकचा वापर थांबविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने जनजागृती करण्यात येत आहे. या अंतर्गत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृतीप्रमाणेच दुकाने व व्यवसायाच्या ठिकाणी प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा राबवून विभाग कार्यालयातील तसेच परिमंडळ कार्यालयातील विशेष पथकांव्दारे नियमितपणे तपासणी करण्यात येत असते. या तपासणीमध्ये प्लास्टिक पिशव्या अथवा एकल वापर प्लास्टिक वस्तू आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येते व एकल



वापरातील प्लास्टिकचे साहित्य जप्त करण्यात येते. या अंतर्गत जानेवारी २०२५ पासून नोव्हेंबर २०२५ पर्यंत ११ महिन्यांत रू. २० लाख ६५ हजार इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली असून २१४६. ९७० कि.ग्रॅ. प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

एकल वापर प्लास्टिक व त्यातही मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणा-या प्लास्टिक पिशव्यांचा वापर नागरिकांनी टाळावा याकरिता महानगरपालिकेच्या वतीने विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून त्यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधाची अंमलबजावणी तपासणीसाठी विशेष मोहीमाही राबविण्यात येत आहेत. याकरिता विभागनिहाय ८ तसेच परिमंडळनिहाय २ अशी १० विशेष पथके तैनात आहेत. त्यांच्यामार्फत विविध आस्थापनांची तपासणी करण्यात येऊन एकल वापर प्लास्टिकचा उपयोग होत असल्याचे आढळल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. यामागे दंडवसूली ही भूमिका नसून प्लास्टिकचा वापर थांबावा हे उद्दिष्ट असल्याचे सांगुन त्याचा वापर थांबवावा असे अवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# सीवूडमध्ये ४२ आस्थापनांवरील मार्जिनल स्पेसची कारवाई

## दोन लाख १३ हजारहून अधिक दंडवसुली

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर धडक कारवाई करण्यासोबतच मार्जिनल स्पेसचा बेकायदेशीर वापर करण्याविरोधातही धडक मोहीम राबविली जाते.

बेलापूर विभाग कार्यालयामार्फत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त डॉ राहुल गेठे व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. कैलास गायकवाड यांचे मार्गदर्शनखाली सीवूड सेक्टर ४२ येथील दुकानांसमोरील सामासिक जागेचा वापर



करणाऱ्या ४२ व्यावसायिक आस्थापनांवर धडक कारवाई करून रू. २ लाख १३ हजार ५०० इतक्या रक्कमेची वसूली करण्यात आली.

बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत नेरकर आणि आत्माराम काळे, स्वप्नील तारमाळे व अतिक्रमण विभागाचे पोलीस पथक यांच्या उपस्थितीत ही मोहीम घेण्यात आली.

# वायू प्रदूषण कमी करण्यासाठी रस्ते स्वच्छता मोहिमेमध्ये सातत्य

**नवी मुंबई :बातमीदार**

वायू प्रतिबंधात्मक रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रणाकरिता विशेष सखोल स्वच्छता मोहीम सातत्याने राबविली जात असून शहरातील हमरस्त्यांप्रमाणेच अंतर्गत भागातील मुख्य रस्त्यांच्या सखोल स्वच्छतेकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. अगदी सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही ही विशेष स्वच्छता मोहीम प्राधान्याने राबविली जात आहे.

या अंतर्गत आज सानपाडा से-४ येथील दैनंदिन मार्केट परिसर व से-३ केमिस्ट भवन मार्ग या ठिकाणी सखोल स्वच्छता करण्यात आली. यामध्ये ब्रश झाडूने रस्त्यांची स्वच्छता करुन माती एकत्र जमा करण्यात आली व संकलित माती वाहून नेण्यात आली. रस्ते स्वच्छतेसाठी फ्लिपर मशिनचाही उपयोग करण्यात आला. अशाच प्रकारे दिघा विभागात ईश्वरनगर मुकंद चौक ते शंकर मंदीर पर्यंतचा रस्ता बारकाईने साफ करण्यात आला.

त्याचप्रमाणे घणसोली विभागात रबाळे एमआयडीसी क्षेत्रामध्ये विशेष



स्वच्छता मोहीम हाती घेऊन रस्त्यांची स्वच्छता करण्याप्रमाणेच रस्त्याच्या कडेला पडलेला बांधकाम राडारोडा वाहून नेण्यात आला. त्याचप्रमाणे साफ केलेले रस्ते प्रक्रियाकृत पाण्याने धुवून घेण्यात आले. तसेच एनकॅपच्या आधुनिक वाहनाव्दारे हवेमध्ये पाण्याचे कारंजासारखे फवारे मारुन हवेतील धूळ कमी करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली. घणसोली विभागात कातकरी पाडा, गणपतीनगर परिसरातही सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

अशाच प्रकारे ऐरोली विभागात से-१७ येथे अभ्युदय बँक ते मस्जिद पर्यंतचा रस्ता आणि परिसर दोन्ही बाजूने सखोल स्वच्छता मोहीम राबवित साफ करण्यात आला.महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार विभाग पातळीवर तयार केलेल्या समुहांव्दारे महापालिका क्षेत्रातील वायू प्रदूषण नियंत्रणासाठी रस्ते स्वच्छता व धूळ नियंत्रक धडक मोहीम संबंधित विभाग अधिकारी तथा सहा.आयुक्त यांच्या माध्यमातून नियमितपणे राबविण्यात येत आहे.२५ नोव्हेंबरपासून सुरु असलेल्या नियमित सखोल स्वच्छता मोहीमांमुळे नमुंमपा क्षेत्रातील वायू गुणवत्ता निर्देशांकातकाहीशी सुधारणा दिसत असून शहर स्वच्छतेतही लक्षणीय सुधारणा दिसून येत आहे.

# उरण वाहतूक पोलिसांकडून विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा धडे

**उरण : बातमीदार**

परंपरेने वाहणाऱ्या शिस्तीच्या धारेत नवा उजेड टाकत, उरण वाहतूक शाखेने वेशवी येथील प्राथमिक शाळेतील लहानग्यांना रस्ते सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. भविष्याची पावले सुरक्षित रहावीत, यासाठी पोलीस प्रशासनाने ज्ञानाचा हा सुंदर दिवा पेटवला.

कार्यक्रमात रस्ता ओलांडताना डावीकडे-उजवीकडे पाहण्याचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, शाळेच्या बसमध्ये चढताना-उतरताना काळजी घेणे, सायकल चालविताना डावीकडून चालणे, हेल्मेटचे अत्यावश्यक महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. मोबाईल किंवा हेडफोन वापरत रस्ता न ओलांडण्यासारख्या आधुनिक काळातील धोक्यांबाबतही विद्यार्थ्यांना सावध करण्यात आले.

अपघात दिसल्यास तत्काळ शिक्षकांना माहिती देणे, तसेच १०० किंवा ११२ वर कळवणे याबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली. या प्रबोधन सत्राला सुमारे ४० ते ५० विद्यार्थी व शिक्षक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

हा उपक्रम दिनांक ०९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडला असून संपूर्ण सत्राचे मार्गदर्शन पोउनि उद्धव सोळंके यांनी उत्साहपूर्ण संयमी शैलीत केले. समाजाच्या उद्याचा पाया असलेल्या या बालकांना सुरक्षिततेचे संस्कार देत उरण वाहतूक पोलिसांनी पुन्हा एकदा संवेदनशीलतेचे उदाहरण घालून दिले.



# पनवेलच्या मिरची गल्लीत इमारतीला आग



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील मिरची गल्ली येथील एका अर्थवट बांधकाम स्थितीत असलेल्या इमारतीला आग लागल्याची घटना आज घडली आहे. शहरातील मिरची गल्लीच्या प्रवेशद्वाराजवळील आर्किड क्लिनिकच्या बाजूला असलेल्या अर्थवट बांधकाम स्थितीतील इमारतीमध्ये आज दुपारी अचानकपणे आग लागून येथे असलेल्या गवताने व प्लस्टिकने पेट घेतला.

याबाबत परिसरातील जागृत नागरिकांना माहिती मिळताच त्यांनी त्वरित येथे जाऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान काहींनी तात्काळ पनवेल अग्निशामक दलाशी संपर्क साधून माहिती दिली. त्यानुसार अग्निशामक दल घटनास्थळी दाखल होत त्यांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरु केले. दरम्यान हा भाग दाटीवाटीच्या असल्याने आगीने रौद्र रूप धारण केले असते तर मोठ्या प्रमाणात परिसराचे नुकसान झाले असते. यापूर्वीसुद्धा आ भागात अश्या प्रकारच्या आगीच्या घटना घडल्या आहेत.

# युईएस कॉलेजमध्ये मार्केटिंग डे आणि उद्योजक मेळावा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ण्ड टेक्नॉलॉजी मध्ये मार्केटिंग डे व उद्योजक मेळावा सोमवारी (दि. ८) मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. मार्केटिंग डे व उदयोजक मेळाव्याचे उद्घाटन युईएस संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर यांच्या हस्ते झाले. त्यांच्यासोबत उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर, सहसचिव ॲड. अपूर्वा ठाकूर, स्कूल व ज्यु.कॉलेजच्या प्राचार्या सिमरन दहिया, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व पीटीए सदस्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञानही मिळावं या दृष्टीने युईएस व्यवस्थापनाने मार्केटिंग डे तसेच उदयोजक मेळावा साजरा



करण्याचा आगळावेगळा उपक्रम हाती घेतला आहे. त्याकरिता युईएस स्कूल ॲण्ड कॉलेजतर्फे आग्रहाचं आमंत्रण सर्व पालकांना देण्यात आलं होतं, ज्याला प्रतिसाद म्हणून पालकांनी प्रचंड प्रमाणात सरस्वती मंडप व त्याच्या बाहेरील परिसरात गर्दी केली होती. आलू चाट व गुलाबजाम, कप केक, मेहंदी, हेअर रबर व कि चेन, दूध कोल्ड्रींक, पाणीपुरी, चॉकलेट ग्लास केक व स्ट्रॉबेरी क्रीम, वुलन हेअर बॅण्ड व इतर वस्तू, बर्गर व चायनीज भेळ, ज्युस यांचे स्टॉल्स उद्योजक मेळाव्याच्या निमित्ताने सिनिअर कॉलेजच्या विदयार्थ्यांनी लावले होते. तर स्कूल व ज्यु. कॉलेजच्या विदयार्थ्यांनी फळे व भाज्यांचे स्टॉल्स लावले होते.

पालकांचा प्रतिसाद इतक्या मोठया प्रमाणात होता की, काही वेळेतच सर्व स्टॉलवरील विविध वस्तू, खाद्य पदार्थ तसेच फळे व भाज्या संपल्या गेल्या, तरीही पालकांची गर्दी ओसरत नव्हती.

भाजी, फळे व विविध वस्तू विकण्याचा अनुभव घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. आपल्या पाल्यांकडून भाजी इत्यादी वस्तू विकत घेण्यासाठी आलेल्या पालकांच्याही चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

# जहाजाच्या क्रँकशाफ्टचा वाशी पोलिसांकडून लिलाव

**नवी मुंबई : बातमीदार**

सप्टेंबर २०१७मध्ये वाशी पोलिसांनी जप्त केलेल्या ९०० किलो वजनाच्या जहाजाच्या क्रँकशाफ्टची – वाशी न्यायालयाच्या प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, सीबीडी बेलापूर यांच्या निर्देशानुसार – १३ डिसेंबर २०२५ रोजी विक्री होणार आहे.

सुमारे ७ फूट बाय १ फूट लांबीचे हे साहित्य आठ वर्षांपासून पोलिसांच्या ताब्यात आहे. कोणताही योग्य दावेदार पुढे न आल्याने, न्यायालयाने सार्वजनिक लिलावाद्वारे त्याची विल्हेवाट लावण्याचे आदेश दिले आहेत.१३ डिसेंबर रोजी वाशी पोलिस ठाण्याच्या आवारात लिलाव होणार असल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी सांगितले. त्यादिवशी इच्छुक खरेदीदार पोलिस ठाण्याला भेट देऊ शकतात, पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी न्यायालयाच्या आदेशांनुसार विल्हेवाट लावली जात आहे.

# तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सवाचा शुभारंभ मंगळवारी (दि. ९) उत्साहपूर्ण वातावरणात झाला. प्राचार्य बबन साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित हा दोन दिवसीय क्रीडा महोत्सव १० डिसेंबर २०२५ पर्यंत विविध स्पर्धांनी रंगणार आहे.

महोत्सवाच्या निमित्ताने खो-खो, कबड्डी, धावणे, थाळीफेक, गोळाफेक अशा विविध पारंपरिक तसेच मैदानी क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ न्हावाशेवा वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैशाली गलांडे यांच्या हस्ते झाला. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी खेळामुळे शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगत सर्व स्पर्धकांना



यशाच्या शुभेच्छा दिल्या.

क्रीडा शिक्षक प्रा. केशव पवार यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांची तयारी करून दिली असून संपूर्ण आयोजन सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यांनी विशेष मेहनत घेतली.या कार्यक्रमाला वीर वाजेकर कॉलेजचे प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर, स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात,वाहतूक पोलिस किरण म्हात्रे,दिवेकर प्रा. किशोर पाटील, ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख प्रा. बाबूलाल पाटोळे,सायन्स विभागप्रमुख प्रा. झुंझार माने, कॉमर्स विभागप्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई विद्यापीठाकडून 'केबीपी'ला चॅम्पियनशीप

**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजला मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडून सलग दोन वर्षे 'आविष्कार स्पर्धेत ठाणे विभागातून सर्वाधिक पारितोषिके प्राप्त केल्याबद्दल दि. २९ नोव्हेंबर रोजी मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या बक्षीस वितरण समारंभात सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन चॅम्पियनशीप बहाल केली.

मुंबई विद्यापीठाकडून दरवर्षी विभागीय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढीस लागावी ह्या हेतुने ठाणे विभागीय स्तरावर आविष्कार स्पर्धेचे आयोजन केले होते. कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ असे सलग दोन वर्षे आविष्कार स्पर्धेत एकूण अकरा पारितोषिके विभागीय स्तरावर प्राप्त केली.यामध्ये होटोगोंडा पाटील, अतिथी घरत, साक्षी जगदाळे, अफिफा मुजावर, अनिष्का मौर्य, प्रेरणा ढाके, अर्पिता शिंदे, अथर्व बाबर, आदेश खामकर, माधवी कदम, सबरीन खान, साक्षी घोलप, अथर्व जाधव, गिरिश्मा शिंदे व श्रुती रुद्रे या विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प सादर केले होते.

# महानगर गॅस लि.तर्फे बौद्धिक दिव्यांग संस्थेला सुलभ बस प्रदान

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगर गॅस लिमिटेड (एमजीएल) च्या सीएसआर उपक्रमांतर्गत राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई यांच्यासाठी सुलभ बसचे औपचारिकरित्या लोकार्पण करण्यात आले. ही बस समुदायाधारित पुनर्वसन सेवांसाठी दिव्यांगजनांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेषतः तयार करण्यात आली आहे.

या बसचे लोकार्पण राष्ट्रीय बौद्धिक संस्थेचे संचालक डॉ. बी. व्ही. रामकुमार, महानगर गॅस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आशू सिंगल आणि संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ रवी प्रकाश सिंह यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय बौद्धिक संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई येथे संपन्न झाले.कार्यक्रमात आशू सिंगल यांनी राष्ट्रीय बौद्धिक संस्था प्रादेशिक केंद्र, नवी मुंबईद्वारा समुदायाधारित व आऊटरीच कार्यक्रमांद्वारे



दिव्यांगजनांसाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

डॉ. बी. व्ही. रामकुमार यांनी पुराव्यावर आधारित पुनर्वसन पद्धतींची गरज आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी मॉडेल) मजबूत करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

याच बरोबर देशात क्रॉस डिसॅबिलिटी अर्ली इंटरव्हेन्शन प्रभावीपणे राबविण्यासाठी राष्ट्रीय बौद्धिक संस्था आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयु ) करण्यात आला. हा करार राष्ट्रीय बौद्धिक संस्थेचे संचालक डॉ. बी. व्ही. रामकुमार आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या सह-संस्थापक सुश्री फरीदा लांबे यांच्या हस्ते स्वाक्षरीत करण्यात आला. दोन्ही संस्थांनी देशभरात क्रॉस डिसॅबिलिटी अर्ली इंटरव्हेन्शनचे अभ्यासक्रम फ्रेमवर्क अंमलात आणण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची बांधिलकी व्यक्त केली.या सहकार्यामुळे दिव्यांग मुलांसाठी गुणवत्तापूर्ण पुनर्वसन सेवा व प्रारंभी हस्तक्षेप कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होणार आहे.

# विन्हेरे मार्गासाठी संपादित जमिनीचा मोबदला बाजारभावाप्रमाणे द्या

## शेतकऱ्यांची मागणी



**महाड : प्रतिनिधी**

सन २००५च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाट पूर्णपणे बंद झाल्याने या घाटाला पर्यायी मार्ग म्हणून नातू नगर, तुळशी खिंड, विन्हेरे, महाड असा पर्यायी मार्ग करण्यात आला. त्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीदेखील संपादित झाल्या, मात्र तब्बल वीस वर्षानंतर शेतकऱ्यांच्या जमिनीचा मिळालेला नाही. हा मोबदला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बाजारभावाप्रमाणे मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा इशारा महाड येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

कशेडी घाटाला पर्यायी मार्ग म्हणून विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीतून सन २००५च्या नैसर्गिक आपत्तीमध्ये पूर्वीचा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ व आताचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ पूर्णपणे खचल्यामुळे या महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून रस्ता करण्यात आला व त्यासाठी या गावातील किमान १३५ शेतकऱ्यांच्या जमिनी रस्त्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ताब्यात घेऊन त्यावरही रस्ता तयार केला. महाड-विन्हेरे-तुळशीखंड- नातू नगर या मार्गाकरता विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील १३५ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून यासाठी त्यावेळी २७०० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली, मात्र आजपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनीची संयुक्त मोजणी झालेली नाही.

या रस्त्याच्या कामासाठी विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून आज २० वर्षांचा कालावधी लोटला, मात्र ना शेतकऱ्यांना इतक्या वर्षापासून संपादित केलेल्या जमिनीचे भुईभाडे; ना त्यावरील नष्ट केलेल्या आंबा, काजू, जांभूळ यासारख्या झाडांचा मोबदला व शेतकऱ्यांचे जनावरांचे गोठे व घर याचादेखील मोबदला मिळालेला नाही.

रस्त्याच्या कामासाठी संपादित झालेल्या विन्हेरे, ताम्हणे, फाळकेवाडी ज्या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत त्यांना बाजार भावाप्रमाणे भाव देणे अपेक्षित आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी या रस्त्याच्या कामासाठी संपादित झाल्या आहेत त्या जमिनी बहुमूल्य किमतीच्या असल्याने शेतकऱ्यांना बाजारभावाप्रमाणे भाव मिळणे अपेक्षित आहे, मात्र २० वर्षांचा कालावधी उलटून गेला. त्यांनी याकडे पत्रकार परिषदेत लक्ष वेधले.

महाड येथे मंगळवारी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये येथील शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या कारभाराविरोधात नापसंती व्यक्त करून तातडीने आमच्या जमिनीची संयुक्त मोजणी व बाजारभावाप्रमाणे जमिनीच्या मोबदला देण्याची मागणी या वेळी करण्यात आली. पत्रकार परिषदेस माजी सभापती सीताराम कदम विन्हेरे गावचे उपसरपंच चंद्रकांत मोरे, जितेंद्र माने यांच्यासह तिन्ही गावातील शेतकरी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांच्याकडे वारंवार विनंती करीत असताना केवळ या बजेटमध्ये काम होईल, पुढच्या बजेटमध्ये काम होईल असे अधिकारी सांगतात. आम्ही सर्व शेतकरी सार्वजनिक बांधकाम विभाग प्रशासनाच्या भूलथापांना आता थकलो असून आम्हाला बाजारभावाप्रमाणे न्याय मिळत नसेल तर आम्ही शेतकरी आता आंदोलनाच्या पावित्र्यात असून येत्या आठ दिवसात आम्हाला आमच्या जमिनीचा मोबदल्याची सुरुवात बाजारभावाप्रमाणे तसेच संपादित केलेल्या जमिनीचे भुईभाडे व त्यावर असणाऱ्या वृक्षसंपदेची नोंद करून त्याचेदेखील मूल्य आम्हाला या संपादित जमीन क्षेत्रांमध्ये समाविष्ट करावे. तसे न केल्यास नाही महाड, विन्हेरे, तुळशीखिंड मार्ग जाणारा राज्य मार्ग आम्ही बंद करण्याचा इशारा शेतकऱ्यांची सार्वजनिक बांधकाम विभाग महाड यांना दिला आहे.

दरम्यान, या संदर्भात प्रतिक्रिया देताना महाडचे प्रांत अधिकारी पोपटराव उमासे यांनी आम्ही या संदर्भात शासनाच्या भूसंपादन विभागाकडे प्रस्ताव पाठवला असून प्रोसिझर सुरू असल्याचे सांगितले.

# शेकोटीची ऊब न्यारी! थंडीच्या दिवसांत पेटू लागल्या शेकोट्या



**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा संपता संपता वेध लागतात ते हिवाळ्याचे आणि गुलाबी थंडीचे. यावर्षी पाऊस लांबल्याने थंडीचा मौसम सुरू होण्यास उशीर झाला होता. गेल्या काही दिवसांपासून संध्याकाळ गारवा वाढू लागला आहे.

हिवाळ्याच्या दिवसांत सकाळी सकाळी पडणारे दाट धुके आणि बोचणारी थंडी सर्वांना हवीहवीशी वाटते. या थंडीबरोबरच उबदार कपडे आणि चौकातून, घराबाहेर, घरांच्या कोपऱ्यांवर उब देण्यासाठी केलेल्या शेकोट्या आणि त्यांच्याभोवती गोलाकार बसून शेकोटीचा आनंद घेणारे नागरिक गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र दिसू लागले आहेत. गारवा वाढत चालल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या आहेत. गारवा वाढत जाईल तशी शेकोट्याभोवती गर्दी वाढत जाणार आहे.

या शेकोट्यांमुळे गप्पांचा फड रंगू लागला असून मनोरंजन होते आहे. अडगळीतील लाकडे, पालापाचोळा, टाकाऊ कागद, पुठ्ठे इत्यादींचा वापर करून या शेकोट्या केल्या जातात. अनेक ठिकाणी हिवाळ्यासाठी खास मोठे लाकूड, ओंडके शेकोटीकरिता ठेवले जाते. दररोज ते पेटवून शेकोटी केली जाते. लहान मुले, स्त्री-पुरुष, वृद्ध, तरुण सर्वजण या शेकोट्यांचा आनंद घेतात. सार्वजनिक ठिकाणी, चौकात आवर्जून शेकोट्या केल्या जातात.

सकाळी साधारणतः साडेसात, आठ वाजेपर्यंत अगदी सूर्याची किरणे जाणवेपर्यंत शेकोटीचा आनंद घेतला जातो तसेच रात्रीही जेवणानंतर अनेक ठिकाणी शेकोट्यांभोवती उबदारपणा घेतला जाऊ लागला आहे. हिवाळा आणि शेकोटीचा हा कार्यक्रम सर्वांच्या जीवनातील आनंदाचा भाग असून गाणी, गप्पा, विनोद आणि मनोरंजनाची वेगळी अशी पर्वणी या निमित्ताने सर्वांना मिळते आहे. ठराविक गावाचे नाव घेऊन त्या गावचा म्हातारा शेकोटीला आला असे गीत हमखास यामधून ऐकायला मिळते. शेकोटीची ही संकल्पना प्राचीन असून शेकोटी आणि हिवाळा हे नाते अधिक घट्ट होत आहे.

“ आमच्या लहानपणापासून सर्वजण हिवाळ्यामध्ये शेकोटीचा आनंद घेत आलो आहोत. आजकाल व्यस्त जीवनामुळे शेकोटीचा कार्यक्रम दुर्मिळ होत असला तरी थंडीच्या दिवसात शेकोटीभोवती बसणे हा आनंदाचाच भाग असतो.

**-राजेश भावे**

थंडीच्या दिवसांत उबदारपणासाठी पेटविल्या जाणाऱ्या शेकोट्यांमुळे मित्रमंडळी, परिवार एकत्र येऊन गप्पांचा मनमुराद आनंद घेतात. व्यस्त राहण्याच्या या काळात शेकोटीमुळे माणसे एकत्र येतात ही बाब समाज हितासाठी चांगली आहे.

**-काशिनाथ गाणेकर**

# ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग अलिबागमध्ये

**पोलादपूर : प्रतिनिधी**

ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मान्यतेने रायगड जिल्हा ग्रंथालय संघ अलिबाग यांच्या विद्यमाने व सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय, अलिबाग यांच्या सहकार्याने महाराष्ट्र शासनाचा ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग जेएसएम कॉलेज, अलिबाग येथे १ जानेवारी २०२६ ते ३० जून २०२६ या कालावधीमध्ये दर शनिवारी व रविवारी होणार आहेत.

ग्रंथपालन प्रमाणपत्रासाठी शैक्षणिक पात्रता इयत्ता १२वी पास अशी आहे. ग्रंथपालन प्रमाणपत्रासाठी प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय, (डोंगरे हॉल, पोस्टाच्या समोर) अलिबाग येथे गुरुवार, १८ डिसेंबर २०२५पर्यंत वर्ग व्यवस्थापक भालचंद्र वर्तक (मोबाईल ९९२१५५१९५२) आणि ग्रंथपाल, सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालय, अलिबाग रजिता माळवी (मोबाईल ८८०५७१६५१२) यांच्याकडे संपर्क साधावा.

यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोदार्डे व सार्वजनिक वाचनालय व जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष गौतम पाटील यांनी केले आहे.

# चांढवे हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी; रोटरी क्लबतर्फे शिबिर




**पोलादपूर : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ महाडच्या चेरी ब्लॉसम प्रोजेक्ट अंतर्गत चांढवे हायस्कूल येथे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिरात एकूण १६० विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली.

या उपक्रमास रोटरी प्रेसिडेंट राजीव वनरसे, माजी अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख डॉ. राहुल सुकाळे तसेच सुकाळे नर्सिंग होमची वैद्यकीय टीम यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. शिबिराच्या आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक वन्नेरे, शिक्षकवृंद आणि शाळा प्रशासन यांनी सहकार्य केले.

शिबिरादरम्यान डॉ. राहुल सुकाळे यांनी विद्यार्थ्यांना हिमोग्लोबिनचे महत्त्व, संतुलित आहार, स्वच्छतेची गरज, ॲनिमिया प्रतिबंधाचे उपाय आणि नियमित आरोग्य तपासणी याबाबत सोप्या व प्रभावी शब्दांत मार्गदर्शन केले.

चेरी ब्लॉसम प्रोजेक्टचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यजागृती वाढवणे, ॲनिमिया कमी करणे आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करणे हा आहे. रोटरी क्लब ऑफ महाड सातत्याने समाजोपयोगी उपक्रम राबवत असून या प्रकल्पातून अनेक विद्यार्थ्यांना निरोगी व उज्ज्वल भविष्याची दिशा मिळत आहे.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यार्थ्यांकडून अभिवादन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द.ग.तटकरे महाविद्यालयात आयटी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन कार्यक्रम झाला. या वेळी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि समाजसुधारक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी दलित आणि वंचित समुदायांच्या हक्कांसाठी आपले जीवन समर्पित केले. कार्यक्रमासाठी उपस्थित महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.राजेंद्र आचार्य यांनी डॉ. आंबेडकर यांचे संविधान निर्मितीमध्ये असणारा वाटा, त्यांचा जीवन प्रवास, दलितांसाठी केलेले कार्य, बौद्ध धर्माची वाटचाल, त्यांची शैक्षणिक वाटचाल, सोशल मीडियाचे कोणतेही साधन नसताना आपल्या कर्तुत्वाने जगभरात मिळवलेली प्रसिद्धी यावर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम. खामकर, आयक्यूएसी व राष्ट्रीय सेवा योजना विभाग समिती सदस्य डॉ. जे.आर. पांडेय, आयटी विभाग प्रमुख प्रा.भानुप्रसाद विश्वकर्मा, राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.नेहा तुराई व प्रा.स्वप्नील सपकाळ, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथपाल व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण कार्यक्रमाची तयारी व नियोजन आयटी विभागातील प्रा. तेजस्विनी आचार्य यांनी केले.




# नांदगाव हायस्कूल येथे क्रीडा स्पर्धा

**मुरूड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे शालेय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांना शालेय अभ्यासाबरोबरच विविध क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करता यावी यासाठी या स्पर्धेचे आयोजन करून मुलांना खेळाविषयी आस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

या क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन सहजीवन विद्या मंडळाचे संचालक गणेश गाणार यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर, सागर राऊत, महेश वाडकर, दत्तात्रेय खुळपे, योगेश पाटील, शिक्षकेतर प्रतिनिधी संतोष बुल्लू, शिक्षक प्रतिनिधी भारत चव्हाण, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संखेने उपस्थित होते.

या वेळी उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संचालक गणेश गाणार यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी खेळाविषयी आस्था ठेवावी. खेळामध्ये जय पराजय होत असतो. म्हणून खचून न जाता खेळाचा सराव जास्त केल्यास निश्चित यश मिळू शकते. खेळात सातत्य ठेवल्यास आपण उत्तम खेळाडू बनू शकता. यासाठी सराव आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

मुख्याध्यापिका अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर यांनीही मनोगत व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. स्पर्धेत क्रिकेट, खो-खो, कबड्डी, अन्य खेळ घेण्यात आले. स्पर्धेस विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# तुकसई येथे आरोग्य शिबिर



**चौक : प्रतिनिधी**

श्री बापूजी वारकरी संप्रदाय ग्रामस्थ मंडळ तुकसई व लायन्स क्लब खालापूर यांनी मेडिकव्हर हॉस्पिटल खारघरच्या सहकार्यातून तुकसई येथे अखंड हरिनाम सप्ताहानिमित्ताने आरोग्य शिबिर आयोजित करून एक वेगळा पायंडा तयार केला.

मधुमेह, रक्तदाब, एलस तपासणी, डोळे तपासणी, मोफत चष्मे वाटप व आय ड्रॉप वाटप, रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. परिसरातील सुमारे ४६० जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

धार्मिक कार्यक्रमाबरोबरच आपल्या आरोग्य तपासणीची लाभ वारकऱ्यांना मिळाल्याचे रायगडभूषण ज्येष्ठ कीर्तनकार रामदासमहाराज पाटील यांनी सांगितले. यावेळी लायन्स क्लब अध्यक्ष लायन हभप किशोर पाटील, माजी अध्यक्ष शिवानी जंगम, जितेंद्र सकपाळ, लहू भोईर, हभप ज्ञानेश्वरमहाराज पाटील, हभप रामदास उतेकर, अजित पांगारे, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# एकदा तरी रायगड किल्ल्यावर जाऊन माथा टेकवा -पानिपतकार विश्वास पाटील

**चौक : प्रतिनिधी**

कुठल्याही तीर्थक्षेत्राला नाही गेला तरी चालेल, पण रायगड किल्ल्यावर जाऊन माथा टेकवून याच, असे आवाहन ज्येष्ठ लेखक, माजी सनदी अधिकारी, पानिपतकार विश्वास पाटील यांनी कवी माधव यांच्या रायगडावरील कवितेचा संदर्भ देऊन केले.



यशवंतराव आनंदराव उर्फ आण्णासाहेब देशमुख स्मृती समिती आणि विद्या प्रसारिणी सभा चौक यांनी माजी अध्यक्ष यशवंतराव आनंदराव उर्फ आण्णासाहेब देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ खालापूर तालुक्यातील माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांकरीता सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर, चौक येथे वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संम्मेलनाचे नियोजित अध्यक्ष सुप्रसिध्द साहित्यिक पानिपतकार विश्वास पाटील यांच्या हस्ते विद्यार्थी यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

महापुरुषांच्या रायगड जिल्ह्यात येऊन व नेताजी पालकर यांच्या जन्मगावी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्याचे भाग्य मिळाले असे सांगून आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर करा, असे आवाहन विश्वास पाटील यांनी विद्यार्थीवर्गाला केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेच्या अध्यक्ष शोभा देशमुख यांनी केले. निखिल देशमुख यांनी लेखक विश्वास पाटील यांचा परिचय करून दिला, तर शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी आभार व्यक्त केले.

खालापूर तालुक्यातील २० शाळा आणि ६० विद्यार्थी यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. कार्यक्रमास राज्याचे आरोग्यदूत मंगेश चिवटे, तालुक्यातील उच्च पदस्थ, वकील, साहित्यिक, कलाप्रेमी, विद्यार्थी उपस्थित होते. व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांनी व्यापारी असोसिएशनतर्फे सन्मान करून मानपत्र दिले.

नमुंमपा चषक ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धा

# लातूर, पुणे संघ विजेते



**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या मैदानात नवी मुंबई महापालिका चषक महाराष्ट्र राज्य ज्युनिअर व्हॉलीबॉल अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धा २०२४-२५ अतिशय उत्साहात झाली. पुरुष गटात लातूर, तर महिला गटात पुणे विभागाच्या संघाने विजेतेपद पटकाविले.

स्पर्धेत मुंबई, अमरावती, संभाजीनगर, नाशिक, पुणे, नागपूर, लातूर, कोल्हापूर अशा आठ विभागांच्या पुरुष व महिलांच्या संघांनी सहभागी होत क्रीडागुणांचे दर्शन घडविले. गुणवत्तापूर्ण खेळ करणाऱ्या खेळाडूंची निवड करून महाराष्ट्र राज्याचा पुरुष व महिलांचा ज्युनियर व्हॉलीबॉल संघ जाहीर करण्यात आला. हे संघ राजस्थान येथे १६ ते २१ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धेत देशपातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.

पुरुष गटात लातूर विभागाच्या संघाने मुंबई विभागाच्या संघावर मात करीत अंतिम विजेतेपद पटकाविले. कोल्हापूर विभाग तृतीय क्रमांकाचा व अमरावती विभाग चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. मुंबई विभागातील यश शेट्टी या खेळाडूस मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कोल्हापूर विभागातील रोहित बोकारडे हा खेळाडू बेस्ट स्मॅशर पारितोषिकाचा आणि लातूर विभागातील सय्यद फैजान हा खेळाडू बेस्ट सेटर पारितोषिकाचा मानकरी ठरला.

महिला गटाच्या स्पर्धेत पुणे विभागाच्या संघाने लातूर विभागाच्या संघाला अंतिम सामन्यात पराभूत करुन विजेतेपद पटकाविले. नाशिक विभाग तृतीय क्रमांकाचा व मुंबई विभाग चतुर्थ क्रमांकाचा मानकरी ठरला. पुणे विभागातील साक्षी साळुंखे या खेळाडूला मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लातूर विभागातील श्रुती राऊत ही खेळाडू बेस्ट स्मॅशर पारितोषिकाची व पुणे विभागातील समृध्दी चांदगुडे ही खेळाडू बेस्ट सेटर पारितोषिकाची मानकरी ठरली.



# कबड्डी स्पर्धेत शिवाई बांधण संघ विजेता

**अलिबाग : प्रतिनिधी**

दत्त जयंतीचे औचित्य साधून ग्रामस्थ मंडळ वडगाव यांच्या वतीने स्व. काशिनाथ भगत व स्व. बाळू थळे स्मृतीचषक कबड्डी स्पर्धा श्री स्वामी दत्तनाथ चैतन्यधाम ट्रस्ट रसाणी टेकडी येथे आयोजित करण्यात आली होती. या कबड्डी स्पर्धेत शिवाई बांधण संघाने जय भवानी वाशी संघवार मात करून विजेतेपद पटकावले.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आस्वाद पाटील, माजी सदस्य संजय पाटील, वडगाव सरपंच सारिका पवार, सदस्य सरिता भगत, रूपाली पाटील, नीलम थळे, शुभांगी भगत, सजना नाईक, संतोष बोले, प्रसाद पाटील, नरेश थळे, चंद्रकांत ठाकूर, महेश थळे, प्रफुल पाटील, मिलिंद भगत, किशोर भगत, संतोष सुतार, प्रमोद पाटील, नितेश थळे, अजय भगत, नथुराम कावजी, सीताराम भगत आदी उपस्थित होते.

स्पर्धेत १६ निमंत्रित संघ सहभागी झाले होते. जय भवानी वाशीला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. नूतन हनुमान ढवर संघाने तृतीय, तर जय हनुमान वायशेत संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला.

स्पर्धेत वायशेत संघाचा विनीत म्हात्रे याला उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पकडीसाठी वाशी संघाच्या कौस्तुभ पाटील, पब्लिक हिरो ढवर संघाच्या सिद्धेश पाटील, तर स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून शिवाई बांधण संघाच्या राज जंगम यांना घोषित करण्यात आले.

विजेत्या संघांना वडगावचे माजी सरपंच जयेंद्र भगत, माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे निरीक्षक म्हणून जनार्दन पाटील उपस्थित होते. समालोचन सुनील थळे, नरेश कडू आणि प्रवीण भगत यांनी केले.



# बौद्धिक अक्षम मुलांच्या शाळेचे यश

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेचे क्रीडा शिक्षक कांतीलाल पाटील यांची नुकतीच नॅशनल कोच म्हणून निवड झाली आहे. याशिवाय अहिल्यानगर येथे झालेल्या राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेत शाळेतील विद्यार्थिनी एंजल पारचे हिने उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली तसेच नेहाला चोरघेने तिसरा क्रमांक पटकाविला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नंदकुमार जाधव, खजिनदार अतुल वाणी, सचिव सुरेश जाधव, श्रेया जाधव यांनी विद्यार्थी, क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगडची विजयी आगेकूच



**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निमंत्रित आंतरजिल्हा १४ वर्षाखालील मुलांच्या दोनदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने महाराष्ट्रातील सर्वात नामांकित व बलाढ्य क्रिकेट अकॅडमी म्हणून ओळख असलेल्या कैडेंस क्रिकेट अकॅडमी, पुणे संघावर पहिल्या डावाच्या आघाडीवर दणदणीत विजय मिळवत इतिहास रचला.

रायगडच्या संघाने साखळी फेरीत चमकदार कामगिरी करत सुपर लीगच्या सामन्यांसाठी पात्रता मिळवल्यानंतर सुपर लीगमध्येसुद्धा दमदार कामगिरी सुरू ठेवली आहे. पुणे चांदखेड येथील थर्टीयार्ड क्रिकेट मैदानावर कैडेंस क्रिकेट अकॅडमी संघाला रायगडच्या गोलंदाजी पुढे हात टेकावे लागले. रायगडचा अष्टपैलू खेळाडू व जलदगती गोलंदाज ऋणाल गिजे याने कैडेंसच्या सात फलंदाजांना बाद करत या संघाचा डाव अवघ्या १२२ धावांवर रोखला. रायगडच्या संघाने पहिल्या डावात सर्व गडी बाद २०९ धावसंख्या उभारली. यामध्ये रायगडच्या संघाचा सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज आरव बरळ याने ५२ धावांची अर्धशतकीय खेळी करत संघाला पहिल्या डावाची आघाडी मिळवून दिली त्याला दुसऱ्या बाजूने कर्णधार देव सिंह यांनी मूल्यवान ३७ धावा काढून साथ दिली. रायगडच्या संघाने पहिल्या डावात ८७ धावांची भक्कम आघाडी घेत सामन्यावर पकड घेतली.

दुसऱ्या डावात कैडेंसच्या संघाने संयमी फलंदाजी करत दोन गडी बाद २२४ धावा केल्या. यामध्ये विरेंन अटोळे याने ११५ धावा काढून शतक झळकले, तर भाव्यराजे भोसलेने नाबाद ५२ धावांची खेळी केली. २२४ धावांवर डाव घोषित केल्यानंतर रायगडच्या संघासमोर जिंकण्यासाठी १३७ धावांचे लक्ष ठेवले होते. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा रायगडच्या संघाचा डाव चार गडी बाद ५६ धावांवर रोखण्यात आला. सामना अनिर्णित राहिला असला तरी रायगडच्या संघाने पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळवला आहे.

रायगड संघाच्या दमदार कामगिरीबद्दल जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी सर्व खेळाडूंचे तसेच प्रशिक्षक सागर कांबळे यांचे अभिनंदन केले व पुढील सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.

# राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेत रायगडचा संघ चॅम्पियन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लातूर येथे झालेल्या ३५व्या क्योरगी आणि ११व्या पूमसे महाराष्ट्र राज्य वरिष्ठ तायक्कांडो स्पर्धेत रायगड तायक्कांडो असोसिएशनच्या वरिष्ठ संघाने १३ सुवर्ण, आठ रौप्य आणि एक कांस्यपदक जिंकत पूमसे विभागात प्रथम क्रमांकाची चॅम्पियनशिप ट्रॉफी जिंकली.

रायगड संघाने विविध गट व प्रकारांमध्ये उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य, शिस्त आणि संघभावना दाखवत राज्यभरात आपली छाप उमटवली. पूमसेमध्ये ३० वर्षांखालील गटात व्यक्तिगत पुरुष शुभम पोवारने रौप्य, महिलांमध्ये सेजल काणेकरने कांस्यपदक जिंकले. मिक्स्ड पेअरमध्ये सनी पासवान व रतिका अहुजा यांनी रौप्य, ग्रुप पुरुषमध्ये शुभम पोवार, दिनेश म्हात्रे व सोहम कुरघोडे यांनी रौप्य, ग्रुप महिलांमध्ये सेजल काणेकर, अनन्या चितळे व गायत्री महाजन यांनी सुवर्णपदक पटकाविले. ४० वर्षांखालील गटात व्यक्तिगत पुरुष गटात प्रशांत घरत, महिलांमध्ये प्राजक्ता प्रकाश अंकोलेकर आणि मिक्स्ड पेअरमध्ये प्रशांत घरत व मुग्धा भोसले यांनी सुवर्णपदक प्राप्त केले.

फ्रीस्टाईल पूमसे व्यक्तिगत पुरुष गटात सनी पासवानने सुवर्ण, तर मिक्स्ड ग्रुपमध्ये राज बादल, दक्षय थोंबरे, तनिष कोनकर, भाग्यश्री भोंडवे, रुतुजा टुपसुंदर यांनीही सुवर्णपदकावर नाव कोरले. क्योरगीमध्ये ६८ किलोखाली शुभम पोवार याने आणि ८७ किलोखालील गटात विशाल सानपने रौप्यपदकावर मोहोर उमटवली. कोच अनिल म्हात्रे यांनी मार्गदर्शन केले.



पनवेलमध्ये रविवारी रोटरी महिला मॅरेथॉन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या सहकार्याने रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलने रोटरी महिला मॅरेथॉन येत्या रविवारी (दि. २१) सकाळी ६ वाजता वडाळे तलाव येथे आयोजित केली आहे. या वर्षीची मॅरेथॉन रन फोर वोट अशी आगळीवेगळी संकल्पना घेऊन येत आहे.

पनवेल परिसरातील लोकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता आणि या अभियानात महिलांचा सहभाग हेच या मॅरेथॉनचे उद्दिष्ट आहे. सहभागी महिलांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

जास्तीत जास्त संख्येने या मॅरेथॉनमध्ये सहभागी व्हावे आणि शासनाच्या मतदान जागरूकता अभियानाला हातभार लावावा, असे आवाहन प्रेसिडेंट अनिल ठकेकर, सेक्रेटरी अतिष थोरात, प्रोजेक्ट चेअरमन सिकंदर पाटील आणि को चेअरमन ऋषिकेश बुवा यांनी केले आहे.

# माणगाव प्रीमियर लीगचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव प्रीमियर लीग (एमपीएल)चे उद्घाटन माणगाव तालुका क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक ॲड.राजीव साबळे यांच्या हस्ते मोर्बा रोडवरील मैदानात झाले. या सोहळ्यास संघमालक, संयोजक, ३२ संघांचे कर्णधार, खेळाडू, मान्यवर आणि क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सहा दिवसीय स्पर्धेत विजेत्यांसाठी लाखो रुपयांची रोख बक्षिसे, मोटरसायकल,सायकल, ट्रॉफीज आणि इतर अनेक पारितोषिकांची रेलचेल आहे. यामुळे खेळाडू आपले कौशल्य, अनुभव पणाला लावून खेळ दाखवत प्रेक्षकांची मने जिंकत आहेत.

स्पर्धेचे खास वैशिष्ट्य म्हणजे विशाल आणि सुंदर सजवलेले मैदान, प्रेक्षकांसाठी प्रशस्त गॅलरी, खेळाडूंसाठी वेगवेगळ्या सुविधा, थेट प्रक्षेपण (लाईव्ह स्ट्रीमिंग), विद्युत प्रकाशयोजना, खानपान सोय, नेटके आणि शिस्तबद्ध नियोजन पाहून प्रेक्षक मोठ्या संख्येने येथे गर्दी करत आहेत.



# शरीरसौष्ठवपटू प्रणव पुजारीचा सत्कार



**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शरीरसौष्ठवमध्ये उत्तुंग भरारी घेणाऱ्या तालुक्यातील गोंधळपाडा येथील प्रणव उमेश पुजारी याचा रविवारी ग्रामस्थांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

गोवा येथे नुकत्याच झालेल्या आयसीएन इंडिया शरीरसौष्ठव स्पर्धेत तालुक्यातील गोंधळपाडा येथील प्रणव उमेश पुजारी याने वेगवेगळ्या कॅटेगिरीत घवघवीत यश मिळवले आहे. त्यामुळे २०२६मध्ये आयसीएनच्या वतीने होणाऱ्या शोसाठी त्याने पात्रता मिळवली आहे. या स्पर्धेत प्रणवने बॉडीबिल्डिंग कॅटॅगिरीत तिसरा क्रमांक, पुरुष फिजिक कॅटॅगिरीत चौथा क्रमांक, पुरुष फिटनेस मॉडेल कॅटॅगिरीत सुवर्ण पदक, प्रो क्वालिफिकेशन स्पर्धेत ३० स्पर्धकांतून तिसरा येण्याचा मान पटकावला आहे. या कामगिरीबद्दल त्याची पुढील वर्षी गोवा येथे होणाऱ्या आयसीएन शो २०२६साठी निवड झाली आहे. प्रणवने अनेक जिल्हास्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत सहभाग घेऊन अनेक बक्षीस पटकावली आहेत.

या कामगिरीबद्दल प्रणवचा रविवारी सायंकाळी गोंधळपाडा येथील समाजमंदिरात ग्रामस्थांतर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास वेश्वी ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गावडे, ग्रामपंचायत सदस्य उद्धव भितळे तसेच प्रसाद गोतावडे, सतीश पुजारी, भास्कर पुजारी, अमित पुजारी, दिलीप सुद, राजेंद्र जाधव, पराशर भितळे, प्रणव याचे कुटुंबिय, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुटुंबीय, ग्रामस्थ आणि मित्रपरिवाराने नेहमीच प्रोत्साहन दिले असल्याचे सांगून प्रणवने सर्वांचे आभार मानले.

शरीरसौष्ठवपटू प्रणव याने प्रतिकूल परिस्थितीतून शरीरसौष्ठव क्षेत्रात मोठे यश मिळविले आहे. वडिलांच्या अकाली निधनानंतर त्याच्या आईने अलिबाग शहरात वृत्तपत्र विक्री करून आपल्या दोन मुलांना उच्च शिक्षण दिले आहे. प्रणवने सिव्हिल इंजिनीअरिंगपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असून तो सध्या बांधकाम क्षेत्रात कार्यरत आहे.

# स्पेशल ऑलिम्पिकमध्ये ओजस अडांगळेचे यश



**नवी मुंबई : बातमीदार**

नमुंमपाचे ईटीसी केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या ओजस राहुल अडांगळे याने अहिल्यानगर येथे डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील फाऊंडेशन आणि जनसेवा फाऊंडेशन, लोणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्पेशल ऑलम्पिक भारत महाराष्ट्र स्पर्धेत यश मिळविले.

या स्पर्धेत विळदघाट बायपास महामार्गावर दिव्यांग मुलांची सायकल स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ओजसने पाच किमीचे अंतर जलद पार करीत तृतीय क्रमांक पटकाविला.

ओजसने मिळवलेल्या यशाबद्दल महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, ईटीसी संचालिका डॉ. अनुराधा बाबर यांनी अभिनंदन केले.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com